17 Nov 2026_Layout 1 11/16/2026 11:36 PM Page 1

नोव्हेंबर/November
मंगळवार/Tuesday
दि.१७/Dt: 17
२०२६/2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740

www.jagmitra.com

● बीड/Beed ● वर्ष १७ वे/Year 17 ● अंक २६/Issue 26 ● आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

सुकाळे साहेब, खाक्या दाखवा; जनतेचा पैसा खाऊन माज आलेल्या भ्रष्टाचाऱ्यांना बेड्या ठोका!

पुरावे नष्ट करण्यासाठी उपकार्यकारी अभियंता शाम कुंभार यांच्यावर त्या बकासुराचा दबाव असल्याची जोरदार चर्चा

सन २०२४ चे पत्र २०२६ च्या आवक-जावक रजिस्टरमध्ये घुसवण्याचा डाव सुरू असल्याची सूत्रांची माहिती.



सीडीआर तपासा; तो बकासुर कोण हे लगेच समोर येईल!

दरम्यान, या प्रकरणातील खरा सूत्रधार असलेला तो बकासुर आता चांगलाच हादरला असून, पुरावे नष्ट करण्यासाठी विद्यमान उपकार्यकारी अभियंता शाम कुंभार यांच्यावर प्रचंड दबाव टाकत असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. पोलिसांनी जर उपकार्यकारी अभियंता शाम कुंभार यांचा मोबाईल सीडीआर तपासला, तर त्यांच्यावर दबाव टाकणारा आणि पडद्यामागून सूत्रे हलवणारा तो बकासुर नेमका कोण आहे, हे एका क्षणात स्पष्ट होईल.



गेवराई/जगमित्र न्यूज

मौजे देवपिंप्री येथे महावितरणच्या नियम व अटींना केराची टोपली दाखवून १८ वीज खांब, १ रोहित्र (डीपी) आणि दुसऱ्या रोहित्राचे ७ खांब बेकायदेशीरपणे स्थलांतरित केल्याचा महाघोटाळा उघडकीस आला आहे. दोन वर्षांपासून हे प्रकरण दडपून ठेवणारे आणि जनतेचा पैसा खाऊन माज आलेले भ्रष्टाचारी आता पुरावे नष्ट करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बुध्दीराज सुकाळे यांनी आपला पोलीस खाक्या दाखवून या सर्व दोषींना तात्काळ बेड्या ठोकाव्यात, अशी आक्रमक मागणी संतप्त नागरिकांमधून होत आहे.या प्रकरणात महावितरणच्या अधिकाऱ्यांची मोठी मिलीभगत असल्याचे समोर येत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, १२ जुलै २०२४ रोजी तत्कालीन अधिकाऱ्यांनी केलेला पंचनामा असो वा २ नोव्हेंबर २०२६ रोजी विद्यमान अधिकाऱ्यांनी केलेला पंचनामा, या दोन्ही पंचनाम्यांमध्ये जागेवरून काढलेल्या मूळ उच्चदाब साहित्याचा (तारा, इन्सुलेटर व इतर साहित्य) कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. हे लाखोंचे शासकीय साहित्य नेमके गेले कुठे, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.या महाघोटाळ्याचे सर्व धागेदोरे उघड करण्यासाठी पोलीस निरीक्षक बुध्दीराज सुकाळे यांनी तत्कालीन उपकार्यकारी अभियंता शाम मोरे, संबंधित सहाय्यक अभियंता, लाईनमन आणि ऑपरेटर यांना तात्काळ चौकशी कामी नोटीस देऊन पोलीस ठाण्यात बोलवावे. या सर्वांची कसून आणि सखोल चौकशी केल्यास या प्रकरणातील सर्व रहस्य उघडकीस येईल आणि या भ्रष्टाचाराचा खरा सूत्रधार जगासमोर येईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

आवक-जावक रजिस्टर जप्त करा; एसीबी चौकशीची मागणी..

सूत्रांच्या माहितीनुसार, संबंधित बकासुर सन २०२४ मधील जुने पत्र आता सन २०२६ मध्ये आवक-जावक रजिस्टरला नोंदवून कागदपत्रांत फेरफार करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे गेवराई उपविभागीय महावितरण कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता सतर्क राहण्याची गरज आहे. पोलिसांनी तातडीने महावितरण कार्यालयातील मूळ आवक-जावक रजिस्टरची झेरॉक्स प्रत ताब्यात घेऊन सील करावी, जेणेकरून पुराव्यांशी छेडछाड होणार नाही. तसेच, या संपूर्ण भ्रष्टाचाराची व्याप्ती मोठी असल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तात्काळ हस्तक्षेप करून या घोटाळ्याचा छडा लावावा, अशी जोरदार मागणी सर्वसामान्य जनतेकडून केली जात आहे.

एसपी साहेब, ग्रामीण पोलिसांचा गुन्हेगारीवर ना धाक ना दरारा!

सांज गेलं सजून,अन् दिवटे गेलं विझून; पात्रुडमध्ये येऊन विजय रामोड यांनी नेमकं काय साधलं?

माजलगाव/प्रतिनिधी

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून पात्रुड परिसरात अवैध धंद्यांनी पुन्हा डोके वर काढल्याची चर्चा नागरिकांमधून होत आहे. गुटखा, मटका, अवैध दारू आणि पत्त्यांचे क्लब यांसारख्या अवैध धंद्यांवर ठोस कारवाई होण्याऐवजी ग्रामीण पोलिसांचे लक्ष नेमके कुठे आहे, असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत.

काल विजय रामोड हे पात्रुड येथे आले आणि जणू काही कारवाईचा देखावा करून टिकली लावून गेले, अशी टीका नागरिकांमधून होत आहे. अवैध धंदे सुरूच राहणार असतील, तर अशा भेटींचा उपयोग काय? केवळ हजेरी लावून आणि कारवाईचा देखावा करून कायदा-सुव्यवस्था अबाधित राहत नाही. अवैध धंद्यांच्या मुळावर घाव घालण्याची हिंमत पोलीस प्रशासन दाखवणार का ? त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकाचे म्हणणे आहे एस पी साहेब आता ग्रामीण पोलिसाचा धाक ना दरारा राहिला नसल्यामुळे ग्रामीणचे पोलीस निरीक्षक विजय रामोड यांची उचल बांगडी करून त्यांना हाकला अशा शब्दाच्या सूर जनतेतून उमटत आहे.

आता विजय रामोड यांना हकला!!

नंबर दोनच्या धंदेवाल्यांशी लाडीगोडी आणि सर्वसामान्यांची उचल बांगडी!

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या कारभाराबाबत आणखी एक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. अवैध धंदे करणाऱ्यांशी जवळीक आणि सर्वसामान्य नागरिकांशी मात्र कठोर वागणूक, असा दुजाभाव होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. काही नागरिकांचा आरोप आहे की अवैध धंदेवाल्यांशी पोलिसांची उठबस आणि सलगी दिसते; मात्र सामान्य माणूस न्याय मागण्यासाठी पोलीस ठाण्यात गेला तर त्याला अपेक्षित सन्मानाची वागणूक मिळत नाही. सर्वसामान्य जनतेचे रक्षण करणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे. अन्याय झाल्यानंतर नागरिक न्यायाच्या अपेक्षेने पोलीस स्टेशनची पायरी चढतात. मात्र तिथेच त्यांना अपमानास्पद वागणूक मिळत असेल, तर त्यांनी न्याय मागायचा तरी कोणाकडे? अवैध धंदेवाल्यांसाठी गोड बोलणे आणि सामान्य नागरिकांसाठी कठोर भूमिका घेणे, हा नेमका कोणता पोलीस प्रशासनाचा नियम आहे?

हप्तेखोरीच्या आरोपांची चौकशी होणार का?

पात्रुड परिसरातील गुटखा, **(पान २ वर)**

परळीतील रामभाऊ वाघमारे यांची कोळी महासंघाच्या युवा जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती!



परळी वैजनाथ/प्रतिनिधी

कोळी समाज संघटनांची शिखर संस्था असलेल्या कोळी महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने रामभाऊ रामभाऊ वाघमारे यांची युवा जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी नवी मुंबई येथे नियुक्तीपत्र देऊन त्यांच्यावर पुढील तीन वर्षांसाठी ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली.

कोळी महासंघाचे ध्येय-धोरण आणि उद्दिष्टे समाजापर्यंत पोहोचविणे, संघटना अधिक मजबूत करणे तसेच कोळी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी सक्रिय योगदान देणे, ही जबाबदारी त्यांच्या माध्यमातून पार पडेल, असा विश्वास संघटनेने व्यक्त केला आहे.

समाज संघटित करून समाजातील तरुणांना संघटनात्मक कार्यात सहभागी करणे आणि समाजाच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, यासाठी वाघमारे यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

कोळी महासंघाचे अध्यक्ष रमेशदादा पाटील, कार्याध्यक्ष प्रकाश बोबडे तसेच सरचिटणीस राजहंस उपके यांच्या वतीने त्यांना नियुक्तीबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांच्या नियुक्तीमुळे समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पाथरी नगर परिषदेच्या राजकारणात परत खळबळ

आ.सईद खान यांचा आठदिवसाच्या आत पलटवार

पाथरी/आवडाजी ढवळे

पाथरी नगर परिषदेच्या राजकारणात परत खळबळ एक नगर सेवक तर दोन नगर सेविकांचे अतीषय जवळचे नातेवाईक यांचा काल आ.सईद खान यांच्या नेतृत्वात मुंबई येथे शिवसेना(शिंदे)पक्षात जाहीर पक्ष प्रवेक्ष केल्याने आ.सईद खान यांनी मित्र पक्षा सहीत विरोधी पक्षावर आठ दिवसात पलटवार केल्याची **(पान २ वर)**



पाण्यासाठी भोपा ग्रामपंचायतीवर महिलांचा हंडा मोर्चा; प्रशासनाच्या दुर्लक्षित धोरणाविरोधात संताप

दोन ते तीन दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न केल्यास गटविकास अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा

धारूर, अतुल शिनगारे

बीड-परळी राष्ट्रीय महामार्गाच्या कामादरम्यान करण्यात आलेल्या खोदकामामुळे धारूर तालुक्यातील भोपा गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. मुख्य जलवाहिनी फुटल्याने गेल्या अनेक दिवसांपासून गावातील पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे. वारंवार मागणी करूनही पाणीपुरवठा पूर्ववत होत नसल्याने संतप्त झालेल्या महिला व ग्रामस्थांनी सोमवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता भोपा ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा काढून प्रशासनाचा निषेध नोंदविला.

गावातील महिलांनी हातात रिकामे हंडे घेऊन ग्रामपंचायत कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी केली. महामार्गाच्या कामासाठी रस्त्यावर पाणी मारण्याकरिता टँकरद्वारे सहज पाणी उपलब्ध करून दिले जाते; मात्र गोरगरीब नागरिकांसह लहान मुलांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात असल्याचा संतप्त आरोप महिलांनी यावेळी केला. प्रशासनाच्या या दुजाभावाच्या भूमिकेमुळे ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याची व्यथा महिलांनी मांडली.



दोन ते तीन दिवसांची मुदत; अन्यथा गटविकास अधिकारी कार्यालयावर मोर्चा

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने प्रशासनाकडे निवेदन देऊन फुटलेली मुख्य जलवाहिनी तातडीने दुरुस्त करून गावातील स्वच्छ पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली. तसेच जलवाहिनीची दुरुस्ती होऊन नियमित पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत गावात पिण्याच्या पाण्याचे टँकर तातडीने सुरू करावेत, अशी मागणी करण्यात आली. येत्या दोन ते तीन दिवसांत प्रशासनाने ठोस कार्यवाही न केल्यास धारूर येथील गटविकास अधिकारी कार्यालयावर तीव्र स्वरूपाचा हंडा मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला. **(पान २ वर)**

आंदोलन हाताबाहेर गेले ; पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे कडून पत्रकारांना धक्काबुक्की...

धाराशिव/प्रतिनिधी

शेतकरी संघटनेच्या आंदोलनाला मिळालेला अभूतपूर्व पाठिंबा पाहून, वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांना बंदोबस्तावरील पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे यांनी धक्काबुक्की आणि मारहाण केल्याचा प्रकार १६ नोव्हेंबरला येडशी धाराशिव महामार्गावर घडला.

शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचे खाजगी वृत्तवाहिनीचे छायाचित्रकार सागर जाधव आंदोलक आणि प्रवासी **(पान २ वर)**



शेतकरी संघटनेने धुळे सोलापूर महामार्ग रोखला

धाराशिव/प्रतिनिधी

शेतकऱ्याच्या ऊसाला पाच हजार रुपये पहिली उचल देण्यात यावी या मुख्य मागणीसाठी शेतकरी संघटनेने १६ नोव्हेंबरला धुळे सोलापूर महामार्गावर आंदोलन केले.

जिल्ह्यातील खाजगी आणि सहकारी साखर कारखाने, कवडीमोल दराने उसाची खरेदी करत आहेत. यामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान होत असताना देखील प्रशासन बघायची भूमिका घेत असल्याचा आरोप शेतकरी संघटनेने केला आहे. शेतकऱ्याच्या ऊसाला,पहिली उचल पाच हजार रुपये द्यावी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान द्यावे या मुख्य मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. १६ नोव्हेंबरला दुपारी साडेबारा पासून धुळे सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावर शेतकरी संघटनेने रास्ता रोको आंदोलनाला सुरुवात केली. या आंदोलनामुळे तब्बल पाच किलोमीटर अंतरावर लांबच्या लांब वाहनाच्या रांगा पाहायला मिळाल्या.या आंदोलनामुळे वाहनधारक प्रवासी आणि आंदोलन यांच्यामध्ये शाब्दिक बाचाबाची झाल्याचा प्रकार आंदोलन स्थळी पाहायला मिळाला.



17 Nov 2026 page 2_Layout 1 11/17/2026 12:33 AM Page 1

महाराष्ट्रातील निर्भीड दैनिक
जगमित्र
विशेष संपादकीय

मोजक्यांची मक्तेदारी!

सर्वप्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन. त्याची प्रमुख कारणे दोन. मुंबई विमानतळावरील विमाने नवी मुंबई विमानतळावर नेली जावीत किंवा काय यावरील वादात त्यांनी उडी घेतली. हे पहिले कारण. आणि नवी मुंबई विमानतळावरील वर्दळ वाढावी यासाठी विद्यमान मुंबई विमानतळावरील काही सेवा तिकडे वळवण्यास त्यांनी स्पष्ट विरोध दर्शवला. हे त्यांच्या अभिनंदनाचे दुसरे कारण. हे दोन्ही विमानतळ अदानी समूहाकडे आहेत. म्हणजे मुख्यमंत्र्यांनी एका अर्थी अदानी समूहाच्या निर्णयास विरोध दर्शवला. ही बाब स्पष्ट केल्यास अभिनंदनामागील कारण लक्षात यावे. नवी मुंबईतील नव्या विमानतळाची वाहतूक वाढावी यासाठी विद्यमान विमानतळावरील सेवा कमी करण्याचा आग्रह धरणे म्हणजे दोन भावांत ज्याचे बरे चालले आहे त्यास व्यवसायात चेपून ज्याचे बेतासबात चालले आहे त्याच्याकडे वळवणे. खरे तर असे करणे हे घरगुती पातळीवरही क्षम्य नाही. त्यामुळे ते शुद्ध व्यावसायिक मुद्द्यावरही अक्षम्यच ठरते. तशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली ही यातील महत्त्वाची बाब. त्यांनी केंद्रीय हवाई वाहतूक खात्यास पत्र लिहून मुंबई विमानतळावरील उड्डाणे नवी मुंबईकडे वर्ग करण्यास विरोध दर्शवला. अदानी कंपनीस मुंबईतील जुना- म्हणजे सांताक्रूझ येथील- विमानतळ पाडून त्या जागी नवीन रचना निर्माण करावयाची आहे. त्यासाठी तो विमानतळ पूर्ण बंद करण्याचा आणि त्या ऐवजी तेथील सेवा नवी मुंबई विमानतळाकडे हलवण्याचा घाट कंपनीने घातला. त्यास आधी विमान कंपन्यांनी विरोध केला. नंतर केंद्र सरकारने मध्यस्थी करून हा निर्णय पुढे ढकलण्यास भाग पाडले. त्यानुसार तो पुढील वर्षापासून अंमलात आणण्याचा निर्णय अदानी समूहाने घेतला. त्यास आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीही आक्षेप घेत असतील तर ती बाब दखलपात्र ठरते. कारण प्रश्न एखाद-दुसऱ्या विमानतळ वा त्याच्या कंत्राटाचा नाही. तो देशात मोजक्यांची मक्तेदारी निर्माण व्हावी का, हा आहे. ही बाब सामान्य करदात्यांशी संबंधित असल्याने त्यावर साधक-बाधक चर्चा व्हायलाच हवी.

ती करताना अदानी समूहास हा विमानतळ कसा मिळाला, तो आधी कोणत्या कंपनीकडे होता, कोणत्या परिस्थितीत त्या कंपनीस आपली मालकी सोडावी लागली, कोणत्या सरकारी यंत्रणांनी त्यासाठी दबाव आणला इत्यादी मुद्द्यांची चर्चा आता करण्यात अजिबात अर्थ नाही. त्यावर पुरेसा काथ्याकूट झालेला आहे आणि त्यातून काही निष्पन्न होत नाही, हेही सिद्ध झालेले आहे. कितीही गंभीर असले तरी कोणत्याही आरोपांना उत्तर द्यायचेच नाही, असा विद्यमान सत्ताधीशांचा खाक्या असल्याने मुंबई विमानतळाच्या बदललेल्या मालकी आणि हस्तांतराबाबत केवळ चर्चा झडल्या. पुढे काही घडले नाही. इतकेच नव्हे तर त्यावेळी आणि त्यानंतर मुंबई विमानतळापाठोपाठ देशातील आठ महत्त्वाचे विमानतळ या कंपनीकडे सोपवण्यात आले. त्यात अहमदाबाद, लखनऊ, जयपूर, मंगळूरु इत्यादी वाढत्या शहरांतील विमानतळांचा समावेश आहे. तसे करण्याआधी या कंपनीस विमानतळ चालवण्याचा अनुभव होता किंवा कसे हा प्रश्नही निरर्थक ठरावा असे विद्यमान वास्तव. साधी टाचणी बनवण्याचाही अनुभव नसलेल्यांस विमाने बनवण्याचे कंत्राट विनासायास देता येत असेल तर रिक्षा स्टँडचेही व्यवस्थापन न केलेल्यांहाती अनेक विमानतळ सोपवणे यात काहीही गैर नाही. हा मुद्दा सरकार आणि संबंधित उद्योगसमूह यांच्या परस्पर संबंधांचा आहे. त्याबाबतही नव्याने बोलावे असे काही नाही. तेव्हा त्या कंपनीच्या पदरात तेलापासून विमानतळापर्यंत आणि डाळी-डालड्यापासून सौरवीज-कोळसाखाणींपर्यंत सर्व कंत्राटे पडत असतील तर त्यास प्राप्त परिस्थितीत इलाज नाही. तेव्हा मुद्दा तो नाही. तो मक्तेदारी वा मक्तेदारीसदृश परिस्थिती निर्माण होऊ देण्याबाबतचा आहे. विमान वाहतुकीच्या क्षेत्रात ही बाब प्रकर्षाने दिसून येते. त्यातूनच काही महिन्यांपूर्वी मइंडिगोफया एका विमान कंपनीने संपूर्ण देशास कसे वेठीस धरले ते दिसून आले. भारतीय विमानवाहतूक क्षेत्रातील जवळपास ६६ टक्के इतका वाटा केवळ मइंडिगोफ या कंपनीचा आहे. म्हणजे हवाई प्रवास करणाऱ्या १०० प्रवाशांपैकी ६६ जण मइंडिगोफ्या वापर करतात. ही बाब त्या कंपनीसाठी कौतुकाची असेलही. पण सरकारने केलेल्या एका नियमाची अंमलबजावणी करण्यास ही कंपनी असमर्थ ठरली आणि सारा देश जमिनीवर आला. त्यातून निर्माण झालेली परिस्थिती महासत्तापदाचे स्वप्न पाहणाऱ्या देशासाठी निश्चित नामुष्कीची होती. आजमितीस मइंडिगोफ आणि मएअर इंडियाफया दोन कंपन्यांत देशातील हवाई वाहतुकीचा ९० टक्के वा अधिकच वाटा विभागला गेलेला आहे. त्यामुळे यातील एका कंपनीचे जरी काही बरे-वाईट झाले तर देश स्तब्ध होतो, अशी परिस्थिती. तीच बाब दूरसंचार क्षेत्राबाबत. सरकारने आपल्या कर्तृत्वाने ममहानगर टेलिफोन निगमफ (एमटीएनएल) आणि मभारत संचार निगमफ (बीएसएनएल) या स्वमालकीच्या कंपन्यांस जवळपास संपवले. आज त्यांचे अस्तित्व म्हणजे शेवटची धुगधुग. या दोन सरकारी कंपन्यांच्या मोक्षाची तजवीज केल्यानंतर सुनील भारती-मित्तल चलित मएअरटेलफ आणि मुकेश अंबानींच्या मरिलायन्सफ्चे मजिओफ यांच्या हाती भारतीय मोबाईल टेलिफोनी एकवटल्यासारखे चित्र आहे. नाही म्हणायला कुमारमंगलम बिर्ला यांच्या मआयडियाफ्च्या सहकार्याने मव्होडाफोनफ मान वर करायचा प्रयत्न करताना दिसतो. पण मएअरटेलफ, मजिओफ यांच्या तुलनेत मव्हीआयफ लक्षणीयरित्या मागे आहे. तेच चित्र सिमेंट क्षेत्रातही दिसते. या क्षेत्रात आदित्य बिर्ला समूहाचे मअल्ट्राटेकफ आघाडी राखून आहे हे खरे. पण गेल्या दशकभरात अदानी समूहाने मोठ्या गतीने अंबुजा, एसीसी आदी कंपन्यास आपल्या झोळीत टाकले आणि सिमेंट उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली. आता जे सुरू आहे ते तसेच कायम राहिले तर उद्या काय होईल हे सांगण्यास व्यवसायतज्ज्ञ असण्याची गरज नाही. वीज वितरण, कोळसा खाणी, त्याचवेळी सौर ऊर्जा, बंदरे, नैसर्गिक वायू, खाद्यतेल, डाळी अशा अनेक क्षेत्रात या समूहाचा विस्तार अचंबित करणारा आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईतील विमानतळ आणि विमान कंपन्यांच्या स्थलांतराचा मुद्दा विचारात घ्यायला हवा. यात महत्त्वाची बाब अशी की संबंधित विमान कंपन्यांनी या स्थलांतरास पूर्ण विरोध केलेला आहे आणि त्याची वाच्यताही केलेली आहे. त्यावर विमानतळ कंपनीचे धाष्ट्र्य असे की या विमान कंपन्यांस तुम्ही मुंबई विसरा हे सांगण्यापर्यंत संबंधितांची मजल गेली. याचा अर्थ अनेक कंपन्यांची मुंबई सेवा रद्द झाली, त्यामुळे मुंबईतील प्रवांशांस गैरसोय झाली तरी चालेल; पण आमच्या नवी मुंबई विमानतळावरील राबता वाढायला(च) हवा. प्रवाशांच्या मतांची फिकीर करण्याची परंपरा आपल्याकडे नसल्याने आणि त्याची गरजही कोणास वाटत नसल्याने त्यांना काय वाटते ही बाब कधीही समोर येणार नाही. तशी ती आल्यास सदरहू उद्योग समूहाचे कर्मचारी वगळल्यास अन्य सर्वांचाच विमान तळ बदलास विरोध असेल. उद्या वा परवा जेव्हा केव्हा नवी मुंबई विमानतळ पूर्ण सज्ज होईल तेव्हा प्रवासी त्याचा वापर स्वखुशीने करतील. पण त्यासाठी पुरेसा काळ जायला हवा आणि परिसराचा विकास व्हायला हवा. त्या अभावी तेथे जाण्याचा आग्रह धरणे म्हणजे केवळ घराच्या भिती बांधून उभ्या राहिल्या म्हणून तेथे राहण्याची जबरदस्ती करण्यासारखे आहे. घराला घरपण येण्यासाठी वीज, पाणी, वाहतूक आदींच्या बरोबरीने परिसरही नांदण्यायोग्य व्हावा लागतो.

आळंदी नगरपरिषद अग्निशमन विभागाच्या तत्परतेमुळे विकास क्लॉथ सेंटर येथील भीषण आग आटोक्यात; एका ज्येष्ठ महिलेचा दुर्दैवी मृत्यू

आळंदी/प्रतिनिधी

आळंदी येथील शिवतेज चौक परिसरातील विकास क्लॉथ सेंटरच्या चार मजली गोडाऊन इमारतीमध्ये सोमवार, दिनांक ९ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ७:५० वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. माधव खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशमन विभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी आगीचे स्वरूप अत्यंत गंभीर असल्याचे निदर्शनास आल्याने तातडीने अतिरिक्त अग्निशमन मदत मागविण्यात आली. त्यानुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अग्निशमन दलाचे अतिरिक्त वाहन व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. आळंदी नगरपरिषद अग्निशमन विभाग, अग्निशमन दल, आळंदी पोलीस प्रशासन, विद्युत विभागाचे कर्मचारी आणि स्थानिक नागरिक



यांच्या संयुक्त प्रयत्नांतून आग आटोक्यात आणण्यासाठी युद्धपातळीवर कार्यवाही करण्यात आली. या बचावकार्यात इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील रहिवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात अग्निशमन कर्मचाऱ्यांना यश आले. मात्र, या दुर्दैवी घटनेत इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर एका ज्येष्ठ महिला श्रीमती शकुंतला इंदरकुमार धाडीवाल यांचा मृतदेह आढळून आला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून नगरपरिषद प्रशासनाकडून तीव्र दुःख व्यक्त करण्यात आले आहे. प्राथमिक माहितीनुसार शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आगीचे स्वरूप पाहता ती इतरत्र पसरू नये यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या. अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अत्यंत तत्परतेने व अथक परिश्रमाने बचावकार्य आणि आग विझविण्याचे काम केले.

पान १ वरून....

एसपी साहेब

मटका, दारू आणि पत्त्यांच्या क्लबवर कारवाई का होत नाही? अवैध धंद्यांना कोणाचे अभय आहे? हप्तेखोरीचे आरोप खरे की खोटे, याची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निष्पक्ष चौकशी होणार का? संबंधित पोलीस अधिकारी आणि बीट कर्मचाऱ्यांच्या कामकाजाची तपासणी होणार का? जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनाथ कावत साहेब यांनी या संपूर्ण प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या कारभाराची निष्पक्ष चौकशी करावी. पात्रुडसह संपूर्ण ग्रामीण हद्दीतील गुटखा, मटका, अवैध दारू आणि पत्त्यांच्या क्लबवर धडक कारवाई करावी. हप्तेखोरीसंदर्भात होत असलेल्या आरोपांची सत्यता तपासून संबंधित अधिकारी आणि बीट कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी. तसेच विजय रामोड यांच्या कामकाजाची चौकशी करून आवश्यक असल्यास त्यांची बदली करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. पोलीस स्टेशन हे सर्वसामान्य जनतेच्या संरक्षणासाठी आहे की अवैध धंदेवाल्यांशी सलगी करण्यासाठी? याचे उत्तर आता जिल्हा पोलीस अधीक्षक नवनाथ कावत साहेब देणार का?

अवैध धंदेवाल्यांसाठी वर्दीचे इमानही गहाण!

पात्रुडमध्ये गुटखा, मटका, पत्त्यांचे क्लब आणि अवैध दारूचा धुमाकूळ; पोलिसांच्या भूमिकेवर नागरिकांचा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. पात्रुड परिसरात गुटखा तस्करी, मटका, पत्त्यांचे क्लब आणि अवैध दारूचे धंदे सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. एकीकडे कायद्याचे रक्षण करण्याची शपथ घेतलेली खाकी वर्दी आणि दुसरीकडे खुलेआम सुरू असल्याचे सांगितले जाणारे अवैध धंदे, यामुळे ग्रामीण पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याऐवजी संबंधितांना अभय मिळत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. अवैध धंदेवाल्यांशी सलगी आणि सर्वसामान्य नागरिकांना मात्र वेगळी वागणूक, असा प्रकार सुरू असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. अवैध धंदेवाल्यांसाठी पोलिसांनी आपल्या वर्दीचे इमान गहाण ठेवले आहे का?असा बोचरा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. खाकी वर्दी ही जनतेच्या संरक्षणासाठी आहे की अवैध धंदेवाल्यांच्या सोयीसाठी, असा संतप्त प्रश्नही उपस्थित होत आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नवनाथ कुवावत यांनी पात्रुडमधील अवैध धंद्यांची प्रत्यक्ष चौकशी करून संबंधित पोलीस अधिकारी आणि बीट कर्मचाऱ्यांच्या कामकाजाची तपासणी करावी. गुटखा, मटका, दारू आणि पत्त्यांच्या क्लबवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. वर्दी अंगावर चढवली म्हणजे कर्तव्य संपत नाही; जनतेचा विश्वास टिकवणे हेच खाकीचे खरे इमान आहे.

गंगामसल्यात अवैध पत्त्याचा क्लब धंद्यांचा बाजार तेजीत; पीआय साहेब, हा धंदा नेमका कुणाच्या आशीर्वादाने?

पत्त्यांचे क्लब, मटका, गुटखा अन् अवैध दारूचा खुलेआम विक्री

गंगामसला परिसरात अवैध धंद्यांनी पुन्हा डोके वर काढल्याची चर्चा सुरू असून पत्त्यांचे क्लब, मटका, गुटखा विक्री आणि अवैध दारूचे व्यवहार सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. या धंद्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी असलेल्या पोलिसांना हे सर्व दिसत नाही की दिसत असूनही दुर्लक्ष केले जात आहे, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. पीआय साहेब, गंगामसला परिसरात नेमके काय सुरू आहे, याची माहिती स्थानिक जनतेला आहे. मग संबंधित पोलीस यंत्रणा अनभिज्ञ कशी? अवैध धंदेवाल्यांना कोणाचे अभय आहे? कोणाच्या आशीर्वादाने हे धंदे सुरू आहेत? या प्रश्नांची उत्तरे आता जनतेला हवी आहेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांची असताना अवैध धंद्यांवर नियंत्रण मिळवण्यात अपयश का येत आहे? केवळ कागदोपत्री कारवाई करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष मैदानात उतरून अवैध धंद्यांचे जाळे उद्ध्वस्त करण्याची गरज आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नवनाथ कुवावत यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन गंगामसला परिसरातील अवैध धंद्यांची निष्पक्ष चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी. खाकीचा धाक गुन्हेगारांना वाटला पाहिजे; खाकीच्या सावलीत अवैध धंदे फोफावले तर जनतेने न्याय मागायचा कुणाकडे?

.....

पाथरी नगर परिषद

जोरादार चर्चा सविस्तर वृत्त आसे कि विधान सभेचे आ.राजेश विटेकर यांच्या नेतृत्वात शिवसेनेचे प्रभाग क्र.०७चे नगर सेवक हासीब खान व शिवसेनेच्या नगर सेविका आलम तरन्नुम बेगम मुजीब आलन यांनी आपल्या नगर सेवकपदाचा राजीनामा देवुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश करण्याचे जाहीर करुन शिवसेना(शिंदे)चे आ.सईद खान यांना धक्का दिला होता या घटनेला आठ दिवस ही होता नाहीत तर आ.सईद खान यांनी पलटवार करुन पाथरी नगर परिषदेतील राष्ट्रवादी कॉंग्रेस(अ.प.)चे नगर अध्यक्षपदाचे उमेदवार तथा स्वीकृत नगर सेवक मोईज अंन्सारी,प्रभाग क्र.१० कॉंग्रेस पक्षाच्या नगर सेविका मंगल राजेश पाटील यांचे पती राजेश पाटील तर प्रभाग क्र.०१ कॉंग्रेस पक्षाच्या नगर सेविका अजिजाबी रशिद खान यांचे पुत्र नईम खान उर्फ नम्मा खान यांचा काल दि.१६/११/२०२६ रोजी मुंबई येथे श्रीकांत शिंदे यांच्या हास्ते शिवसेना(शिंदे)पक्षात पक्ष प्रवेश करुन घेतला आहे आसी जोरदार चर्चा होत आहे

या पक्ष प्रवेशाने पाथरी च्या राजकारणा मध्ये आठ दिवसाच्या आत पलट वार केल्याने खळबळ उडाली आहे या पक्ष प्रवेशाने शिवसेना (शिंदे)ची पाथरी नगर परिषदेतील ताकत वाढनार आसल्याचे बोलल्या जात आहे.

.....

महिलांचा हंडा

महामार्गासाठी पाणी उपलब्ध, मग ग्रामस्थांना का नाही?

सध्या बीड-परळी राष्ट्रीय महामार्गावर सिमेंट रस्त्याचे काम सुरू आहे. या कामादरम्यान रस्त्यावर पाणी मारण्यासाठी सहजपणे पाणी उपलब्ध करून दिले जात आहे. मात्र, गावातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविताना प्रशासनाकडून विविध कारणे पुढे केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. महामार्गाच्या कामाला प्राधान्य देताना स्थानिक नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष का केले जात आहे, असा सवालही महिलांनी उपस्थित केला आहे. आता तरी प्रशासनाने जागे होऊन भोपा गावाचा पाणीप्रश्न तातडीने सोडवावा, अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे.

.....

धक्काबुक्की...

यांच्यातील वादाचे चित्रीकरण करत होते. यादरम्यान धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याचे निरीक्षक वासुदेव मोरे यांनी धक्काबुक्की आणि मारहाण केल्याचा आरोप माध्यम प्रतिनिधीकडून करण्यात आला आहे. रास्ता रोको आंदोलनामुळे महामार्गावर मोठी गर्दी झाली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूला चार ते पाच किलोमीटर अंतरापर्यंत वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या. अशा परिस्थितीत, पोलिसांनी माध्यम प्रतिनिधींना धक्काबुक्की आणि मारहाण केल्याचे सांगण्यात येत आहे. तब्बल पाच ते सहा तास आंदोलन सुरू होते. या आंदोलनामुळे वैतागलेल्या पोलिसांनी आपला राग माध्यमा प्रतिनिधी वर काढण्याचे दिसून आले. माध्यम प्रतिनिधींना मारहाण करणाऱ्या पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे यांना निलंबित करावे अशी मागणी आंदोलन शेतकऱ्यांनी केले आहे. मोरे यांच्या या घटनेचा पत्रकार संघटनांनी निषेध व्यक्त केला आहे.

शेवटच्या पानावरून...

सार्वजनिक शौचालय

नेमका कोणासाठी? असा सवाल या तक्रारीच्या निमित्ताने उपस्थित होत आहे. आता जिल्हाधिकारी या प्रकरणाची दखल घेऊन काय कारवाई करतात, याकडे माजलगावकरांचे लक्ष लागले आहे. शौचालय पाडण्यामागील कारण, त्यासंबंधीची परवानगी आणि संबंधित पदाधिकाऱ्यांची बाजू प्रशासनाकडून स्पष्ट होणे आवश्यक आहे.

.....

आरेफ शेख

वार केल्याच्या खुणा असल्याचा दावा कुटुंबीयांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ अपघात नसून घातपात आणि हत्येचा असू शकतो, अशी गंभीर शंका व्यक्त केली जात आहे. मात्र, पोलिसांकडून या प्रकरणाला अपघाताचे स्वरूप दिले जात असून, त्यामुळे तपासाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे जे.डी. शाह यांनी म्हटले आहे. पोलिस तपासात अनेक त्रुटी असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या प्रकरणातील सत्य जनतेसमोर यावे, कोणत्याही आरोपीला राजकीय अथवा अन्य दबावामुळे अभय मिळू नये आणि पीडित कुटुंबीयांना न्याय मिळावा, यासाठी सदर प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) वर्ग करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. पत्रात पुढे म्हटले आहे की, स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांनी ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांसाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याचा केंद्रबिंदू हा सामान्य माणूस, कष्टकरी आणि वंचित घटक होता. त्यामुळे त्यांच्या वारशाचा उल्लेख करणाऱ्या नेतृत्वाने जात-धर्माच्या पलीकडे जाऊन प्रत्येक पीडित कुटुंबाच्या दुःखात सहभागी होणे अपेक्षित आहे. यापूर्वी केज तालुक्यातील विलास घुले प्रकरणात ज्या तत्परतेने लक्ष घालण्यात आले, त्याच तत्परतेने आरेफ शेख यांच्या प्रकरणातही पंकजाताई मुंडे यांनी पुढाकार घ्यावा. पीडित कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना मानसिक आधार द्यावा, आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी विनंतीवजा मागणी करुन आणि दोषींना कठोर शिक्षा होण्यासाठी ठोस भूमिका घ्यावी, असे आवाहन जे.डी. शाह यांनी केले आहे. पत्रात शेवटी म्हटले की ऊसतोड कामगाराची ओळख त्याच्या जाती-धर्मावरून नव्हे, तर त्याच्या कष्टावरून असते. कष्टकरी माणसाच्या दुःखात सहभागी होणे हीच खरी माणुसकी आणि लोकनेतृत्वाची कसोटी आहे. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचा वारसा चालवायचा असेल, तर तो जात-धर्माच्या भिंती ओलांडून माणुसकीच्या माध्यमातून जपला पाहिजे,'' अशी भूमिका समाजसेवक जे.डी. शाह यांनी व्यक्त केली. आरेफ शेख यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळेपर्यंत या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात यावा आणि पंकजाताई मुंडे यांनी याबाबत आपली भूमिका जाहीर करावी, अशी मागणीही त्यांनी प्रसिद्धीपत्रकाच्या शेवटी केली आहे.

.....

भूमिपूजन

आहेत कंधार तालुक्यातील रस्त्यासाठी १० कोटी ८५ लक्ष रुपये मजूर झाले आहेत तालुक्यातील कंधार-अहमदपूर-घोडज--कुरुळा रस्त्यासाठी १ कोटी ८५ लक्ष, फुलवळ-दिग्रस-जळकोट ४ कोटी तर कंधार-पानभोसी ५ कोटी रुपयाच्या निधीची कामे होणार आहेत. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर,भाजपा महिला आघाडीच्या महामंत्री प्रणिताताई देवरे चिखलीकर, लोहा नगराध्यक्ष शरद पवार, कंधार नगराध्यक्ष शहाजी नळगे, ऍड .मुक्तेश्वर धोंडगे, माजी सभापती आनंदराव पाटील, खुशाल पाटील पांगरीकर, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी शिक्षण सभापती संजय पाटील कऱ्हाळे, उपनगराध्यक्ष करिम शेख, शिवसेना उपजिल्हा प्रमुख ,बाळासाहेब कऱ्हाळे, कंधार उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, माजी उपनगराध्यक्ष जफारोद्दीन बहोद्दीन कृउबा सभापती संजय देशमुख, नगरसेवक स्वप्नील लुंगारे, माजी नगराध्यक्ष अनुसया केंद्रे, गटनेते भास्कर पवार, , चेअरमन (खरेदी) किशनराव डफडे , ॲड. बी. के. पांचाळ, भाजपा चे भगवान राठोड, राकां तालुकाध्यक्ष छत्रपती स्वामी, कंधारचे मनोहर भोसीकर, भाजपा शहर प्रमुख गंगाप्रसाद यन्नावार,माजी कृउबा संचालिका चित्राताई लुंगारे, प्राचार्य राजेंद्र भोसीकर, माजी उपनगराध्यक्ष दता वाले उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, तहसीलदार परळीकर, तहसीलदार गोरे, कार्यकारी अभियंता रामकृष्ण गळधर, बीडीओ मांजरमकर, बीडीओ महेश पाटील, (कंधार) लोहा सा बा उपअभियंता सुमित पाटील, सचिन आयतलवाड (कंधार), माजी सरपंच , बाबाराव गवते, गुरुअप्पा धोंडे, ज्ञानेश्वर गवते उपस्थित राहणार आहेत.

.....

एन.व्ही.पी. शुगर

अवघ्या पंधरा दिवसांत ऊस बिल अदा करण्याची परंपरा एन.व्ही.पी. शुगर परिवाराने सुरू केली असून, चालू गळीत हंगामातही ती कायम ठेवली आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचा मोबदला वेळेत मिळावा, तसेच शेतीच्या पुढील हंगामाचे आणि कौटुंबिक खर्चाचे आर्थिक नियोजन करता यावे, या दृष्टीने कारखाना व्यवस्थापनाकडून नियमितपणे ऊस बिलाचे वितरण केले जात आहे. वेळेत होणाऱ्या या बिलामुळे शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळत आहे. दरम्यान, ज्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी अद्याप आपल्या बँक खात्याशी संबंधित आवश्यक कागदपत्रे कारखान्याकडे जमा केलेली नाहीत, त्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., धाराशिव येथील बँक पासबुकची छायांकित प्रत कारखाना साईटवर जमा करावी, असे आवाहन कारखान्याचे चेअरमन नानासाहेब ऊर्फ बालाजी पाटील यांनी केले आहे.

.....

व्यापारी संकुल

करण्याची कार्यवाही करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा कृषी उत्पन्न बाजार समितीने दिला आहे. त्यामुळे सिरसाळा व्यापारी संकुलातील संबंधित गाळेधारकांनी विहित मुदतीत अनामत रक्कम भरावी, असे आवाहन बाजार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

.....

कारखानदार

नोव्हेंबर रोजी सर्व साखर कारखान्यांच्या अध्यक्षांची बैठक बोलावून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांवर समाधानकारक तोडगा काढण्यात येईल, अशी ग्वाही प्रशासनाच्या वतीने देण्यात आली. प्रशासनाने दिलेल्या या आश्वासनानंतर सायंकाळी सव्वासहा वाजण्याच्या सुमारास स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, दुष्काळी मदत, उसाची पहिली उचल, जनावरांसाठी चारा आणि पीकविमा या मागण्यांवर १८ नोव्हेंबरच्या बैठकीत ठोस निर्णय होण्याकडे आता शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

.....

संस्कार प्राथमिक शाळा

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेचे सचिव श्री. दीपक तांदळे म्हणाले की, ''जननायक बिरसा मुंडा हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या प्रत्येकासाठी प्रेरणास्थान आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपल्या समाजाच्या हक्कांसाठी संघर्ष केला. आदिवासी समाजामध्ये जागृती निर्माण करून त्यांना एकजुटीने अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या जीवनातील धैर्य, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा ही मूल्ये विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अंगीकारली पाहिजेत. शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःची प्रगती साधतानाच समाजाच्या विकासासाठीही योगदान देण्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे.''ते पुढे म्हणाले की, आजच्या विद्यार्थ्यांनी थोर महापुरुषांचे केवळ स्मरण न करता त्यांच्या विचारांचा अभ्यास करून ते आपल्या आचरणात आणणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाचा सन्मान करणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे आणि देशाच्या प्रगतीमध्ये आपला सहभाग नोंदविणे हीच अशा महापुरुषांना खरी आदरांजली ठरेल. कार्यक्रमादरम्यान बिरसा मुंडा यांच्या जन्मापासून ते त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासापर्यंतची माहिती सांगण्यात आली. ब्रिटिश सत्तेविरुद्ध त्यांनी उभारलेल्या उलगुलान अर्थात महान उठावाची पार्श्वभूमी, आदिवासी समाजाच्या जल, जंगल आणि जमिनीच्या हक्कांसाठी त्यांनी केलेला संघर्ष तसेच सामाजिक जागृतीसाठी दिलेले योगदान याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत जननायक बिरसा मुंडा यांच्या जीवनावर आधारित मनोगते व्यक्त केली. त्यांच्या कार्यातील महत्त्वपूर्ण प्रसंग सांगितले, तर काहींनी त्यांच्या विचारांमधून मिळणारी प्रेरणा आपल्या शब्दांत मांडली.संस्कार प्राथमिक शाळेच्या वतीने विविध राष्ट्रीय महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्त अशा उपक्रमांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव, राष्ट्रप्रेम, संस्कार, नेतृत्वगुण आणि आदर्श नागरिकत्वाची भावना विकसित व्हावी, हा या उपक्रमांमागील मुख्य उद्देश आहे.महापुरुषांचे विचार हेच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचे संस्कार! या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना जननायक बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्याची ओळख झाली आणि त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गोडबोले सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. शेप सर यांनी मानले. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

टि.सी. हरवला आहे

रवि भास्कर पारवे संत तुकाराम विद्यालय, नागापुर कॅम्प ता.परळी वै. जि.बीड ची १० वी पास टी सी नागापुर ते परळी वै. प्रवासात हरवला आहे. सापडल्यास त्वरित संपर्क साधावा.

मो. क्र. ९०७५१२५७६७

जाहीरनामा

कार्यालय नगर परिषद, किल्ले धारुर जि.बीड

क्र.२७१८/किनप/नांव लावणे (गुंठेवारी)

दिनांक १६ नोव्हेंबर २०२६

प्रकरण महाराष्ट्र शासन गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २०२१ चे कलम ४ (१) अन्वये

**अर्ज श्री. १) जयराम चंद्रसेन वायकर २) शंकर चंद्र

17 Nov 2026 jalna page 3_Layout 1 11/16/2026 7:42 PM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना | मंगळवार दि.१७ नोव्हेंबर २०२६ | पान ३



आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी आणि स्वाभिमानासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे महान क्रांतिकारक, जननायक धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त भाजपा जालना महानगरच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, जिल्हा उपाध्यक्ष, जिल्हा सरचिटणीस वसंत शिंदे, गोवर्धन कोल्हे, देविदास देशमुख, नागेश अंभोरे, देवलाल काकडे, यश खरात, आदींची उपस्थिती होती.

महाराष्ट्रातील १०३ ग्रामपंचायती बालस्नेही ग्रामपंचायत उपक्रमाच्या नामांकन यादीत!

सहा महसुली विभागांतील ३४ जिल्ह्यांचा समावेश; बालहक्क, शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षिततेला मिळणार प्राधान्य

जालना/प्रतिनिधी

गावाच्या विकासाची दिशा ठरविताना बालकांचे हक्क, त्यांचे शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि सर्वांगीण विकास यांना केंद्रस्थानी ठेवण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रात महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. राज्यातील एकूण १०३ ग्रामपंचायतींचा बालस्नेही ग्रामपंचायत उपक्रमाच्या नामांकन यादीत समावेश करण्यात आला आहे. राज्यातील सहा महसुली विभागांमधील तब्बल ३४ जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींना या उपक्रमात स्थान मिळाले असून, ग्रामीण विकास प्रक्रियेत बालकेंद्रित दृष्टिकोन रुजविण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. विशेष म्हणजे, या नामांकन यादीत जालना जिल्ह्यातील तीन ग्रामपंचायतींचाही समावेश झाला आहे. भोकरदन तालुक्यातील वालसा, जाफराबाद तालुक्यातील भाटोडी आणि सावंगी या ग्रामपंचायतींना या उपक्रमाच्या नामांकन यादीत स्थान मिळाले आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागात बालकांच्या हक्कांबाबत आणि त्यांच्या विकासाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य डॉ. संजय पाटील यांनी या उपक्रमाची माहिती दिली. बालकांना केवळ विकास योजनांचे लाभार्थी न मानता गावाच्या विकास प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक म्हणून स्थान देणे, हा बालस्नेही ग्रामपंचायत संकल्पनेचा मुख्य हेतू असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित होत आहे. बालस्नेही ग्रामपंचायत ही संकल्पना केवळ शाळा, अंगणवाडी किंवा पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेपुरती मर्यादित नाही. गावातील प्रत्येक बालकाला सुरक्षित वातावरण, गुणवत्तापूर्ण शिक्षण, योग्य आरोग्य सुविधा, पोषण, संरक्षण आणि समान संधी मिळाव्यात, यासाठी ग्रामपंचायत स्तरावर नियोजनबद्ध प्रयत्न करणे अपेक्षित आहे. गावातील बालमजुरी, बालविवाह, बालकांवरील अत्याचार, शाळाबाह्य मुले, कुपोषण तसेच बालहक्कांचे उल्लंघन यांसारख्या समस्यांना आळा घालण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे. ग्रामसभेपासून ग्रामपंचायतीच्या विकास आराखड्यापर्यंत बालकांच्या गरजा आणि त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य मिळावे, हा या उपक्रमाचा व्यापक दृष्टिकोन आहे. राज्यातील अमरावती, पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोकण, नाशिक आणि नागपूर या सहा महसुली विभागांतील ग्रामपंचायतींचा नामांकन यादीत समावेश आहे. यामध्ये अमरावती विभागातील १५, पुणे विभागातील १६, छत्रपती संभाजीनगर विभागातील २४, कोकण विभागातील १५, नाशिक विभागातील १५ आणि नागपूर विभागातील १८ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. छत्रपती संभाजीनगर महसुली विभागातून सर्वाधिक २४ ग्रामपंचायती नामांकन यादीत आल्या आहेत. या विभागात

जालना जिल्ह्यातील भोकरदनची वालसा, जाफराबादची भाटोडी व सावंगी ग्रामपंचायत नामांकन यादीत

बीड, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड आणि परभणी या आठ जिल्ह्यांचा समावेश आहे. त्यापैकी जालना जिल्ह्यातील तीन ग्रामपंचायतींना स्थान मिळाले आहे. अमरावती विभागात अकोला जिल्ह्यातील माधापुरी, शेळद, कापशी रोड, अमरावती जिल्ह्यातील यावली शहीद, गौलखेडा बाजार, सांगवी बु., बुलढाणा जिल्ह्यातील पिंप्री काथरगाव, जानुना, देवधाबा; वाशिम जिल्ह्यातील पारवा, कोलार, गायवळ; तर यवतमाळ जिल्ह्यातील कळमणा (बु.), चिखली आणि गोरोळा या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. पुणे विभागात कोल्हापूर जिल्ह्यातील चंदनकुड, साळवण, शंकरवाडी, पुणे जिल्ह्यातील न्हावी सांडस, झगडेवाडी, कुटवळवाडी, सातारा जिल्ह्यातील फत्त्यापूर, चिंचणेर वंदन, विंग, सांगली जिल्ह्यातील अग्रण धुळगाव, सांडगेवाडी, मरळनाथपूर, तसेच सोलापूर जिल्ह्यातील शिवणे, चिंचणी, नरोटेवाडी आणि होटगी स्टेशन या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात बीड जिल्ह्यातील पिंपळगाव, बोरफडी, हिंगणी (बु.); छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तारू पिंपळवाडी, शिवराई, पळशी, धाराशिव जिल्ह्यातील गौर, शिंगोली, गोपाळवाडी, हिंगोली जिल्ह्यातील राहोली खु., वागी, शिवणी, जालना जिल्ह्यातील वालसा, भाटोडी, सावंगी, लातूर जिल्ह्यातील खंडापूर, बोरफळ, अरजखेडा, नांदेड जिल्ह्यातील येरगी, बाभळी बु., वडवणा, तर परभणी जिल्ह्यातील निमगाव, सायळ खु. आणि गोपेगाव या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. कोकण विभागात पालघर जिल्ह्यातील नवझे, हिरवे, खानिवली, रत्नागिरी जिल्ह्यातील देवघर, चोरवणे, कुर्णे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मडुरा, पाडलोस, कुसूर, रायगड जिल्ह्यातील सोमटणे, नारंगी, मांडवणे, तसेच ठाणे जिल्ह्यातील नांदगाव, राहटोली आणि शिंगापूर या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. नाशिक विभागात अहिल्यानगर जिल्ह्यातील दिघी, आरडगाव, कौडाने, धुळे जिल्ह्यातील फागणे, रावेर, न्याहळोद, जळगाव जिल्ह्यातील गांधली, उदयनगर, पिंपळी, नंदुरबार जिल्ह्यातील रांझणी, कात्री, आसाणे; तर नाशिक जिल्ह्यातील बाडगी, मूळडोंगरी आणि ढोताणे बुद्रुक या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. नागपूर विभागात नागपूर जिल्ह्यातील कोतवालबडी, खेडी कर्यात, तास, भंडारा जिल्ह्यातील खडकी, इटगाव (पु.), लाखोरी, चंद्रपूर जिल्ह्यातील घाटकुळ, चिचगाव, कान्हाळगाव, गडचिरोली जिल्ह्यातील कोंढाळा, चोप, दिभना; गोंदिया जिल्ह्यातील लोहारा, मरारटोला, चान्ना, तसेच वर्धा जिल्ह्यातील कोपरा, खरसखांडा आणि मिर्झापूर (नेरी) या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. बालस्नेही ग्रामपंचायत उपक्रमाच्या माध्यमातून गावातील बालकांना आपले प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणे, त्यांच्या मतांचा ग्रामपंचायतीच्या निर्णयप्रक्रियेत विचार होणे आणि बालकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, खेळाची मैदाने आणि सुरक्षित सार्वजनिक जागा या सुविधांकडे बालकांच्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज या संकल्पनेतून अधोरेखित होते. ग्रामपंचायतींनी आपल्या वार्षिक विकास आराखड्यात बालकांसाठी स्वतंत्र प्राधान्यक्रम निश्चित करणे, बाल संरक्षण यंत्रणांशी समन्वय ठेवणे, शाळाबाह्य मुलांचा शोध घेणे आणि बालकांच्या समस्या सोडविण्यासाठी नियमित पाठपुरावा करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

२० नोव्हेंबरला पुण्यात राज्यस्तरीय आयोजन, १०० हून अधिक विद्यार्थी सहभागी–डॉ.संजय लाखे पाटील

जालना/प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या भविष्याचा विचार आता केवळ मोठ्यांच्याच व्यासपीठावर होणार नाही, तर राज्यातील बालप्रतिनिधीही विकासाच्या निर्णयप्रक्रियेत आपला आवाज बुलंद करणार आहेत. बालकांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि लोकशाही मूल्यांची रुजवण करण्यासह त्यांच्या समस्या, अपेक्षा आणि सूचनांना शासनाच्या धोरणनिर्मितीत स्थान मिळावे, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) आणि युनिसेफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने २० नोव्हेंबर २०२६ रोजी पुण्यात 'महाराष्ट्र बाल संसद २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. जागतिक बाल दिनाचे औचित्य साधून यशदा येथे होणाऱ्या या उपक्रमात राज्यातील ३४ जिल्ह्यांतील १०० हून अधिक बालप्रतिनिधी सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र राज्य बालहक्क आयोगाचे सदस्य डॉ संजय लाखे पाटील यांनी ही माहिती दिली.

भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षापर्यंत, म्हणजेच २०४७ पर्यंत महाराष्ट्र कसा असावा, याविषयी बालप्रतिनिधी आपले विचार मांडणार आहेत. राज्यातील १०२ नामनिर्देशित बालस्नेही ग्रामपंचायतींमधून इयत्ता सहावी ते दहावीतील विद्यार्थ्यांची निवड केली असून प्रत्येक जिल्ह्यातून तीन विद्यार्थ्यांना प्रतिनिधित्वाची संधी मिळणार आहे. राज्यातील सहा महसूल विभागांतील निवडलेल्या बालस्नेही ग्रामपंचायतींचा या प्रक्रियेत समावेश आहे. प्रत्येक जिल्ह्यातील तीन प्रतिनिधींपैकी किमान एक मुलगी असणे अपेक्षित आहे. दिव्यांग, तृतीयपंथी तसेच वंचित व उपेक्षित घटकांतील बालकांना प्राधान्य दिले जाणार आहे. बालकांना लोकशाही प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, यासाठी बाल संसदेची रचना विधानसभेच्या कामकाजाच्या धर्तीवर करण्यात आली आहे. सहभागी विद्यार्थी विभागीय समित्यांमध्ये चर्चा करून १२ बालमंत्र्यांची निवड करतील. हे बालमंत्री आपल्यातून बाल मुख्यमंत्री आणि बाल सभापती निवडतील. उर्वरित दहा बालमंत्र्यांकडे विविध खात्यांची जबाबदारी सोपविण्यात येईल. त्यानंतर सभागृहात जिल्ह्यांतील प्रश्न मांडणे, मंत्र्यांची निवेदने ऐकणे, प्रश्नोत्तराच्या तासात सहभाग घेणे आणि उपाययोजनांवर चर्चा करणे, अशा स्वरूपात कामकाज पार पडेलअशीही माहिती डॉ संजय लाखेपाटील यांनी दिली असून बाल संसदेत सहा विभागीय समित्यांमध्ये स्थानिक प्रश्न आणि विकासाच्या संकल्पनांवर चर्चा होणार आहे.

रांजणी येथे भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी

रांजणी /प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथे नुकतीच रविवारी दिनांक १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री विजयकुमार खुळे यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला .ते म्हणाले की भगवान बिरसा मुंडा हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक महान क्रांतिकारक आदिवासी नेते आणि समाज सुधारक होते. त्यांनी इंग्रज राजवटी विरुद्ध लढा दिला. आमचा देश, आमचे राज्य हा नारा देऊन आदिवासी बांधवांना त्यांनी एकत्र केले. त्यांनी लोकांना अंधश्रद्धा, पशुबळी, आणि दारूच्या व्यसना



पासून दूर राहण्याचा संदेश दिला. तसेच निसर्ग आणि स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. असे विजयकुमार खुळे यांनी सांगितले .

यावेळी रामदास साळवे, मारुती पाटोळे, संजय मांडवे, पांडुरंग मांडवे, किरण देशमुख, आयुब अली, विजयकुमार खुळे, पांडुरंग पाटोळे, आदी सह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पाच हजार रुपयांच्या अग्रीम मदतीमुळे शेतकरी कुटुंबांना दिलासा

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा केलेली प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत शेतकरी कुटुंबांसाठी मोलाचा आधार ठरली आहे. ऐन दिवाळीच्या काळात मिळालेल्या या मदतीमुळे कुणाला घरातील किराणा सामानाची व्यवस्था करता आली, तर कुणाच्या सणासुदीच्या खर्चाला हातभार लागला. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि परभणी जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रियांमधून समाधान व्यक्त करत राज्य शासनाचे आभार मानले आहेत. छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील गाढेजळगाव येथील शेतकरी लक्ष्मण ठोंबरे यांनी शासनाच्या विविध योजनांमुळे आर्थिक आधार मिळाल्याचे सांगितले. आपल्या दोन विहिरींचे कृषिपंप वीजबिल तसेच बँक ऑफ महाराष्ट्रकडील दोन लाख रुपयांचे कर्ज माफ झाल्याचा अनुभव त्यांनी सांगितला. त्यानंतर मिळालेल्या पाच हजार रुपयांच्या अग्रीम मदतीमुळे दिवाळी गोड झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. याच गावातील अर्जुन नामदेव गाडेकर यांनीही अग्रीम मदतीबद्दल समाधान व्यक्त करत शासनाच्या कर्जमुक्तीच्या घोषणेचाही उल्लेख केला. करमाड येथील शेतकरी आप्पासाहेब पुंडलिकराव उकिरडे यांनी दुष्काळाच्या काळात मिळालेल्या मदतीमुळे दिवाळी आनंदात साजरी करता आल्याचे सांगितले. याच गावातील शिवाजी उत्तमराव उकिरडे यांनी गोरगरीब कुटुंबांसाठी पाच हजार रुपये ही मोठी रक्कम असल्याची भावना व्यक्त केली. करमाड येथील दत्ता पांडुरंग उकिरडे यांनीही गावातील अनेक शेतकऱ्यांना मदत मिळाल्याचे सांगत शासनाच्या कर्जविषयक उपाययोजना आणि वीजबिल सवलतींमुळे दिलासा मिळाल्याचे नमूद केले.

दिव्यांग बांधवांना शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा

परतुर/पिराजी गायकवाड

दि. १६ रोजी परतूर तालुक्यातील दिव्यांग बांधवांना शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देऊन योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी निवेदन देण्यात आले. या निवेदनात परतुर तालुक्यातील अनेक दिव्यांग बांधव आर्थिक, सामाजिक ,कौटुंबिक अडचणींचा सामना करीत आहेत.

शासनामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी विविध योजना ,अनुदाने ,आर्थिक सहाय्य व इतर सवलती उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. मात्र अनेक दिव्यांग बांधवांना या योजनांची पुरेशी माहिती नसल्यामुळे तसेच प्रशासकीय प्रक्रियेत फार मोठ्या अडचणी व योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे दिव्यांग बांधव या सवलतीपासून वंचित राहत आहेत. या निवेदनात दिव्यांग बांधवांना स्वतंत्र अंत्योदय राशन कार्ड तात्काळ देण्यात द्यावे.

शासनाच्या योजनांची माहिती गाव पातळीवर उपलब्ध



करून द्यावी. पात्र दिव्यांग व्यक्तींचे संजय गांधी निराधार तात्काळ सुरू करावे. तसेच इंदिरा गांधी ,श्रावण बाळ इत्यादी आर्थिक सहाय्य योजनांचा दिव्यांगांना लाभ देण्यात द्यावा, दिव्यांग प्रमाणपत्र कार्ड बाबत आवश्यक ते मार्गदर्शन करावे संजय गांधी निराधार कार्यालयामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावे अशा विविध मागण्यांचे निवेदन आज दिव्यांग बांधवांनी दिले.

या निवेदनावर हनुमान वसंतराव माने मा जिल्हाध्यक्ष प्रहार संघटना परतुर, तालुकाध्यक्ष माऊली संदिपान कदम ,शहराध्यक्ष शेरखान जब्बार खान पठाण , माजेद वाहेब सय्यद,मदन विश्वंभर बरकुले, महादेव दादाराव सोळंके ,अंकुश शेषेराव सरडे, सचिन सुधाकर खवल ,पुंजाराम नारायण काळे, शेख समीर शेख सलीम ,उषा गणेश पडघने ,आसिया बेगम अतिक खान पठाण , वाहाप शेख वजीर शेख ,हुसेन मिरांजी शेख ,बबन किसनराव लाईतवार ,प्रभा मधुकर पाटूळे ,वशिष्ठ मुंजाजी गाडगे ,बाळू रामकिसन केसरखाने ,आशामती श्याम तांबके नवाब शेख, शेख हुसेन , शेख अन्सार इत्यादी अपंग बांधवांच्या त्या निवेदनावर सह्या आहेत तरी या मागण्यांकडे तहसीलदार कशाप्रकारे दिव्यांग बांधवांची मदत करेल असे सर्वांचे लक्ष लागले आहे.

भगवान बिरसा मुंडा यांचा पुतळा शहरात उभारू राजेश राऊत

जालना/प्रतिनिधी

जालना येथे विठ्ठल मंदिर कसबा येथे दि.१५ नोव्हेंबर २०२६ रोजी जालना महानगरपालिकेचे उपमहापौर राजेश राऊत यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली यावेळी मार्गदर्शन करताना उपमहापौर राजेश राऊत यांनी आदिवासी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी बिरसा मुंडा यांनी खूप मोलाचे योगदान दिले आहे. यांच्या मार्गदर्शनामुळे आदिवासी समाजा ने जल जंगल जमीन सुरक्षित राखण्याचे काम केल्यामुळे आज नैसर्गिक संपत्ती टिकून राहिली आहे.या आदिवासी समाजाने सामाजिक दृष्टिकोनातून खूप मोठे योगदान दिले आहे समाजाला दिशा आणि प्रेरणा मिळावी यासाठी जालना शहरात महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये भगवान बिरसा मुंडा यांचा भव्य पुतळा उभा करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले या कार्यक्रमाला जालना महानगरपालिकेचे उप महापौर राजेश राऊत ,बाबासाहेब वानखेडे गोकुळ स्वामी माणिक मोठे चंद्रकांत रत्नपारखे वंचितास भगुरे रजनीकांत बंडालू ओम कायंदे गणेश बेनिवाल कैलास रसाळ शिवलाल वडोदे किरण खानापुरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती

बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याचे जालना शहरामध्ये भव्य अनावरण करण्याचे आश्वासन राऊत यांनी यावेळी दिले.अध्यक्ष स्थानावरून बोलताना राजेश राऊत यांनी सांगितले की बिरसा मुंडा यांच्या विचाराने देशात क्रांती होऊ शकते, त्यामुळे संपूर्ण आदिवासी समाजाने संघटित होण्याची काळाची गरज आहे, लवकरच जालना शहरातील एका नामांकित चौकाला बिरसा मुंडा यांचे नाव देण्यात येऊन त्या ठिकाणी बिरसा मुंडा यांचा भव्य असा पुतळा उभा करण्यात येईल , सदरील कार्यक्रमाचे आयोजन आदिवासी समाज



विकास मंच यांच्या वतीने घेण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. विजय कुमठेकर म्हणाले की, ब्रिटिश काळापासून ते आजपर्यंत आदिवासी समाज हा संघटित कधी होऊ शकला नाही, देशपातळीवर हा समाज फार मोठ्या प्रमाणात असून या समाजामध्ये शिक्षण येणे ही काळाची गरज आहे. केवळ कायदे करून हा समाज संघटित होणार नाही तर या समाजाला संघटित करण्यासाठी शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणामुळे माणसांना पदवी मिळते पदवी प्राप्त केलेल्या माणसाने समाज बदलविण्यासाठी आणि समाजाला एकत्र करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, ब्रिटिश काळामध्ये कोणाची साथ नसताना बिरसा मुंडा यांनी उलगुलान केले होते, आज विकासाच्या नावाखाली या देशातील संपूर्ण आदिवासींना बेघर करण्यासाठी, षड्यंत्र सुरू आहेत. विकास हा केवळ दीन,दलित, शोषित, आदिवासी यांच्यावरच अवलंबून असतो का? देशाच्या सर्वोच्च पदावर एक आदिवासी महिला बसलेली असताना सुद्धा तिचा अवमान कशा पद्धतीने केला जातो हे आजही आपण पाहतो, संसदेच्या भूमिपूजन प्रसंगी उद्घाटन प्रसंगी तिला बोलावले जात नाही, राम मंदिरासारख्या ठिकाणी केवळ आदिवासी आहे म्हणून तिला बोलावले जात नाही पण गंमत अशी आहे मित्रांनो, नाशिक येथील कुंभमेळ्यात तिला बोलावून संपूर्ण आदिवासी समाजाला एकत्र केले जाते. अशा कार्यक्रमातून आदिवासी संस्कृती संपवण्याचे षडयंत्र देशात सुरू आहेत, आदिवासींच्या नावाने फायदे घेण्यापेक्षा देशातील विकासाचे महत्वाचे धागे झाले पाहिजेत, मा .आ. कैलास शेठ गोरंट्याल, म्हणाले की मी सातत्याने आदिवासी समाजाच्या सोबत राहणार आहे , त्यांनी आवाज द्यावा कधीही वेळप्रसंगी मदत करण्यास तयार आहे,शिवलाल अक्षय यांचीही मनोगत झाले, बाबासाहेब वानखेडे , शिवप्रकाश चितळकर, यांनीही यावेळी शुभेच्छा दिल्या. माणिक तोटे, चंद्रकांत रत्नपारखे, गंगाराम आढाव, अंगद कापरे, किशोर स्वामी, बन्सीदास भगुरे, रजनीकांत बंडालू, ओम कायंदे, गणेश बेनीवाल कैलास रसाळ शिवलाल वडोदे, संतोष लामकाने, गयाबाई साळवे, रेखा षडमल्लू, शिवकन्या षडमल्लू, करुणा साळवे, प्रगती षडमल्लू, प्रशंशा षडमल्लू , शैलेश लिंबेकर, इत्यादीसह अनेक कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता, यावेळी कार्यक्रमासाठी आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात सहभागी झाला होता. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक , आभार प्रदर्शन गोकुळ स्वामी यांनी केले.

दैनिक जगमित्र आवृत्ती कार्यालय मंमादेवी शॉपिंग सेंटर दु. नं.१ रेल्वे स्टेशन रोड मस्तगड जुना जालना मो. ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — मंगळवार दि.१७ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ४



लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उज्ज्वल व पारदर्शक कारभारासाठी सहकार पॅनलच्या पाठीशी उभे राहा

शिट्टी चिन्हावर मतदान करण्याचे ॲड.उदय गवारे व विचारवंतांचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व मतदारांना अतिशय नम्र निवेदन करतो की, लातूर जिल्ह्यातली जी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आहे, ती अनेक वर्षांपासून आदरणीय दिलीपरावजी देशमुख साहेबांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत उत्कृष्टपणे चालत आहे. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत सहकार पॅनलच्या पाठीशी उभा राहून स्वच्छ, पारदर्शक कारभार, शेतकरी व सर्व सामान्य हिताचा जपणूक करणाऱ्या सहकार पॅनलच्या उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन ॲड. उदय गवारे आणि त्यांच्यासोबत सार्वजनिक जीवनात कार्यरत अनेक विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते व बुद्धिवंतांनी केले आहे.

या निमित्ताने पुढे बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, केवळ मराठवाड्यातच नव्हे तर महाराष्ट्रातल्या पहिल्या पाच बँकांमध्ये या बँकेची गणना होते. आपण पाहतोय की काही ठिकाणच्या जिल्हा मध्यवर्ती बँका पार तोट्यात आल्या आणि बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत लातूरची ही बँक, जिचे भागभांडवल कोट्यवधी रुपयांचे आहे, कर्जवाटपही तेवढ्याच सक्षम पद्धतीने होते, त्या ठिकाणचा असणारा कर्मचारी वर्ग हा गुणवत्तेवर निवडला जातो. विशेषतः या ठिकाणी असणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. आणि या सगळ्याचे श्रेय जर कोणाला जात असेल, तर ते आदरणीय दिली-परावजी देशमुख साहेबांना जाते. म्हणून ही बँक चांगली आहे, त्याचे कौतुक केलेच पाहिजे. राजकीय विचारसरणी भिन्न असू शकते, राजकीय विचार वेगळा असू शकतो, परंतु आदरणीय दिलीपराव देशमुखांनी बँकेचे पॅनल करताना पक्षाच्या पलीकडे जाऊन सगळ्यांना एकत्र करून हे सहकार पॅनल तयार केले. म्हणून आपण त्यांच्या पाठीशी उभे राहूया आणि सहकार पॅनलला जास्तीत जास्त मतांनी त्यांचे उमेदवार निवडून आणावेत. चार उमेदवार त्यांचे आधीच बिनविरोध संचालक आलेले आहेत. अजून १५ जागांसाठी निवडणूक होत असून १५ जागांसाठी होत असलेल्या सर्व



उमेदवारांना सहकार पॅनलच्या ज्यांचे निवडणूक चिन्ह शिट्टी आहे त्या शिट्टीच्या चिन्हावर मतदान करावे, अशी कळकळीची विनंती केली आहे

या निवेदनावर आणि आवाहनात ॲड. भाई उदय गवारे, सुपर्ण जगताप, डॉ. बी. आर. पाटील, डॉ. कल्याण बरमदे, सूर्यप्रकाश धूत, माधव बावगे, ॲड. किशनराव बेंडकुळे (अहमदपूर), प्रा. हर्षवर्धन कोल्हापूरे, ॲड. आर. वाय. शेख, सूर्यकांत वैद्य, मकरंद जाधव, बसवंत बरडे, ॲड. विजय जाधव, डॉ. नीलम पन्हाळे, रजनी वैद्य, प्रा. दत्ता सोमवंशी, प्रा. सुधीर अनवले, विद्याधर कांदे पाटील, नरसिंह इंगळे, भाऊसाहेब उमाटे, बाळकृष्ण धायगुडे, अमर देशमुख, वैभव तळेकर, अजय पाटील नळेगावकर (उदगीर), ॲड. सुशील सोमवंशी (निलंगा), गोविंद पवार (जळकोट), कॉ. उत्तम होळीकर, ॲड. कालिदासराव देशपांडे, प्रा. मनमथ पंचाक्षरी, धर्मराज पाटील, कॉ. विश्वंभर भोसले, बसवराज उटगे, कॉ. संजय मोरे, विजय दबडगावकर, कॉ. सुधाकर शिंदे, भास्कर मुसांडे, अरुण कुलकर्णी, चंद्रकांत साळुंके, प्राचार्य पी. जी. भिसे, प्रताप भोसले, राहुल लोंढे, राजश्री कांबळे यांच्यासह लातूर जिल्हयातील अनेक विचारवंत, शेतकरी व कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

ऋषिकेश कराड यांच्या ऐतिहासिक विजयाचा लातुरात जल्लोष; भव्य विजयी मिरवणूक!



लातूर/संतोष सोनवणे

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीत पतसंस्था मतदारसंघातून ऐतिहासिक विजय संपादन केल्यानंतर भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तथा युवा नेते ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांची कार्यकर्त्यांनी वाजत-गाजत, फटाक्यांची आतषबाजी करत लातूर शहरातील प्रमुख मार्गांवरून भव्य विजयी मिरवणूक काढली. आमदार रमेशआप्पा कराड यांच्या संवाद संपर्क कार्यालयासमोर प्रचंड आतषबाजी करून कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष साजरा केला.

औसा तालुक्यात घुसला पवनचक्कीचा भस्मासुर...

विनापरवाना पवनचक्कीचे विद्युत पोल रोवल्याने शेतकऱ्याने केली नुकसान भरपाईची मागणी...

बी डी उबाळे

औसा : औसा तालुक्यातील वाघोली शिवारात सर्वे नंबर २२१,२२२,२२३ आणि २२५ या शेतामध्ये उषाबाई पंडित पवार,पंडित रामराव पवार,पल्लवी तानाजी पवार आणि शुभांगी बालाजी पवार व इतर शेतकरी यांच्या संयुक्त खाते असलेल्या शेतामध्ये शेतकऱ्यांची कसलीही परवानगी न घेता '' ''या कंपनीमार्फत पवनचक्की पासून विद्युत पुरवठा करणारे विद्युत पोल टाकून लाईनच्या तारा ओढल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या पूर्वपरवानगी शिवाय विद्युत खांब वाहित शेतीमध्ये रोवल्यामुळे शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान होत असल्याचे सांगताच सदर कंपनीच्या कामगारांनी शेतकऱ्यास मारहाण केल्याची तक्रार औसा पोलीस ठाण्यामध्ये दिनांक ९ नोव्हेंबर २०२६ रोजी तक्रार दाखल करण्यात आली असून विनापरवाना विद्युत खांब आणि तारा ओढलेले काढून



घ्यावेत किंवा शेतीच्या नुकसानी चा मावेजा देण्यात यावा अशी मागणी उषाबाई पंडित पवार यांनी तहसीलदार औसा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. तर पवनचक्कीचे दुष्ट चक्र औसा तालुक्यातील अनेक शेतजमीनी तीस वर्षाच्या करारावर कायम बळकावल्या जात आहेत त्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून याकडे सोयस्कर पणे सर्व स्तरातून डोळेझाक केली जात आहे.परंतु भविष्यामध्ये हा पवनचक्कीचा भस्मासुर शेतकरी आणि शेतीसाठी मोठा त्रासदायक ठरणार असल्याची चर्चा सध्या औसा तालुक्यामध्ये जोरदार सुरू आहे. तर अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना प्रशासनाकडून न्याय मिळणे अपेक्षित आहे. परंतु सदरील कंपनी या राष्ट्रीय नेते आणि राजकारणातील बड्या हस्तींच्या असल्याने यावर विशेष पद्धतीने शेतकऱ्यांना प्रशासनाकडून न्याय मिळत नसल्याची चर्चा यापूर्वीही प्रसारमाध्यमांमध्ये जोरदार सुरू आहे.

तळणी शिवारात शॉर्टसर्किटने एक हेक्टर ऊस जळून खाक

बी डी उबाळे

औसा : तालुक्यातील तळणी येथील शेतकऱ्याने त्यांचा काळातही थेंब थेंब पाणी देऊन जोपासलेला ऊस हा वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणाचा कळस ठरला असून आता तोंडाशी आलेला शेतकऱ्याचा घास हा हिरावला गेला आहे..सदरील महिला शेतकरी विमल शिवाजी भोसले यांच्या सर्वे नंबर ३२ मधील एक हेक्टर क्षेत्रावर लागवड केलेला ऊस दिनांक १४ नोव्हेंबर २०२६ रोजी विद्युत तारामध्ये घर्षण निर्माण होऊन झालेल्या ठिणग्या पडत शॉर्टसर्किट होऊन एक हेक्टर



मधील संपूर्ण ऊस जळून खाक झाला आहे.शॉर्टसर्किटमुळे ऊस जळाल्यामुळे महिला शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे.यासंदर्भात विमल शिवाजी भोसले यांनी सहाय्यक अभियंता महावितरण किल्लारी आणि पोलीस उपनिरीक्षक किल्लारी यांच्याकडे रीतसर निवेदन/अर्ज देऊन सदर घटनेचा पंचनामा करावा अशी मागणी केली असून अद्याप पर्यंत महावितरण कंपनीचे दक्ष कर्मचारी पंचनामा करण्यासाठी शेतीमध्ये उपस्थित राहिले नसल्याची खंत शेतकरी विमल शिवाजी भोसले यांनी व्यक्त केली.

लातूर शहरातील अनधिकृत नळ जोडण्या व पाणी अपव्यय रोखण्यासाठी महानगरपालिका पथकाची शोध मोहिम

१८ पथकांमार्फत २७,५१२ घरांना भेटी; २५ नागरिकांवर दंडात्मक कार्यवाही

लातूर/प्रतिनिधी

लातूर शहर महानगरपालिका हद्दीमध्ये पाणीपुरवठा व्यवस्थेतील अनधिकृत नळ जोडण्या, पाण्याचा अपव्यय, नळांना तोटी नसणे तसेच नळ जोडणीतील अनियमितता शोधण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने विशेष सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येत आहे.

सदर मोहिमेंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये १८ पथकांमार्फत सर्वेक्षण व तपासणी करण्यात येत असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मालमत्ताधारकांना आवश्यक त्या नोटिसा देण्यात येत आहेत. सर्वेक्षणादरम्यान अनधिकृत नळ कनेक्शन आढळलेल्या नागरिकांना नोटिसा देण्यात आल्या असून, त्यांच्याकडून सदर नळ जोडण्या नियमानुसार करून घेण्यात येत आहेत. सदर सर्वेक्षणामध्ये एकूण २५ नागरिकांवर दंडात्मक करण्यात आली आहे. तसेच नागरिकांच्या नळ जोडण्यांना एकूण १६४ तोट्या बसविण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे जलवाहिनीला असलेल्या गळतीच्या ठिकाणी दुरुस्तीचे काम सुरू आहे.

सदर सर्वेक्षणादरम्यान आजपर्यंत एकूण २७,५१२ घरांना भेटी देण्यात आल्या असून, एकूण २६७ नागरिकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. तसेच शहरातील एकूण वैयक्तिक बोअरवेलची संख्या ६,४५७ इतकी असल्याचे सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे.

सदर मोहिमेस नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, पाणीपुरवठा व्यवस्थेतील पाण्याचा अपव्यय रोखणे व नागरिकांना पाण्याचा योग्य वापर करण्यास प्रवृत्त करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे सर्व मालमत्ताधारकांनी आपल्या नळ जोडणीची तपासणी करून घ्यावी व नळांना योग्य तोटी बसवून पाण्याचा अपव्यय टाळावा.

लातूर शहरातील सर्व नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळावा, १००% नळांना योग्य तोटी बसवावी, मोटारीद्वारे पाणी उपसा करू नये, अनधिकृत नळ जोडणी करू नये तसेच महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेस सहकार्य करावे, असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

जीवन प्रमाण प्रणालीमध्ये १०० टक्के हयातीचे दाखले नोंदविण्यासाठी

लातूर जिल्हा कोषागार कार्यालयात १८ ते २० नोव्हेंबर दरम्यान निवृत्तीवेतनधारकांचा मेळावा

निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला पाटील यांचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी

जिल्हा कोषागार कार्यालय, लातूर अंतर्गत निवृत्तीवेतन तसेच कुटुंब निवृत्तीवेतन घेणाऱ्या सर्व निवृत्तीवेतनधारकांचे हयातीचे दाखले जीवन प्रमाण या डिजिटल प्रणालीमध्ये १०० टक्के नोंदविण्याच्या उद्देशाने जिल्हा कोषागार कार्यालयाच्या वतीने विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा १८ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जिल्हा कोषागार कार्यालय, लातूर येथे कार्यालयीन वेळेत आयोजित करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाच्या कार्मिक, लोक शिकायत व पेंशन मंत्रालयाच्या पेंशन व पेंशनभोगी कल्याण विभाग तसेच महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागांतर्गत लेखा व कोषागारे विभागाचे प्रधान सचिव आणि संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या १६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या आदेशानुसार ही कार्यवाही करण्यात येत आहे.

निवृत्तीवेतनधारकांना त्यांचे निवृत्तीवेतन नियमितपणे सुरू राहण्यासाठी दरवर्षी हयातीचा दाखला सादर करणे आवश्यक असते. यासाठी शासनाने जीवन प्रमाण ही डिजिटल सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या प्रणालीद्वारे निवृत्तीवेतनधारकांना डिजिटल पद्धतीने आपला हयातीचा दाखला नोंदविता येतो. या सुविधेचा अधिकाधिक लाभ निवृत्तीवेतनधारकांना मिळावा तसेच जिल्हा कोषागार कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व निवृत्तीवेतनधारकांची हयातीची प्रमाणपत्रे जीवन प्रमाण प्रणालीमध्ये नोंदविण्याचे उद्दिष्ट पूर्ण व्हावे, यासाठी या विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यामध्ये जिल्हा कोषागार कार्यालय, लातूर अंतर्गत निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतन घेणाऱ्या लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून जीवन प्रमाण प्रणालीमध्ये हयातीचा दाखला नोंदवून घ्यावा. संबंधित निवृत्तीवेतनधारकांनी निर्धारित कालावधीत कार्यालयीन वेळेत जिल्हा कोषागार कार्यालयात उपस्थित राहून या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच मेळाव्यास येताना सोबत पीपीओ क्रमांक, आधार क्रमांक व मोबाईल घेऊन येणे आवश्यक आहे. निवृत्तीवेतनधारकांना डिजिटल प्रणालीचा लाभ घेता यावा, हयातीच्या दाखल्यांची नोंदणी सुलभतेने पूर्ण व्हावी आणि कोणताही पात्र लाभार्थी या प्रक्रियेपासून वंचित राहू नये, या दृष्टीने हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

तरी लातूर जिल्हा कोषागार कार्यालयांतर्गत निवृत्तीवेतन तसेच कुटुंब निवृत्तीवेतन घेणाऱ्या सर्व निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी १८ ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला हयातीचा दाखला जीवन प्रमाण प्रणालीमध्ये नोंदवून घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला भा. पाटील यांनी केले आहे.

दुष्काळी भागातील एकही पात्र कुटुंब रोजगारापासून वंचित राहू नये

मुंबई : दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन रोजगार हमी योजना आणि व्हीबी जी राम जी अंतर्गत कामांची सर्व स्तरांवर प्रभावी अंमलबजावणी करावी. ग्रामीण भागातील रोजगाराची मागणी करणारे एकही पात्र कुटुंब रोजगारापासून वंचित राहू नये. रोजगार निर्मितीबरोबरच जलसंधारण, चारा उपलब्धता आणि ग्रामीण पायाभूत सुविधांच्या निर्मितीला प्राधान्य द्यावे, असे निर्देश रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी दिले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर व्हीबी जी राम जीअंतर्गत घ्यावयाची कामे आणि प्रलंबित देयके यांचा रोहयो मंत्री गोगावले यांनी दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे झालेल्या बैठकीत आढावा घेतला. दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण जनतेला दिलासा देणे, शेतकऱ्यांना आधार देणे आणि प्रत्येक गरजू कुटुंबाला रोजगार उपलब्ध करून देणे, हे विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. या कामातील जबाबदारी कोणत्याही स्तरावरील अधिकाऱ्याने टाळू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्य शासनाने ११६ कोटी रुपयांचा पूरक कुशल निधी उपलब्ध करून दिला आहे. हा निधी केवळ शासनमान्य आणि निधी वितरण पत्रात नमूद केलेल्या कामांवरच खर्च करावा. पाणंद रस्त्यांच्या ज्या कामांना पूरक कुशल निधीची मान्यता दिली आहे, त्यांचीच देयके अदा करावीत. निधीच्या वापरात कोणतीही अनियमितता किंवा दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असे मंत्री गोगावले यांनी स्पष्ट केले. उपलब्ध निधी योग्य कामांसाठी, योग्य लाभार्थ्यांपर्यंत आणि वेळेत पोहोचविण्याची जिल्हा प्रशासनाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

चाऱ्याची सर्वाधिक टंचाई असलेल्या जिल्ह्यांचे तातडीने मूल्यांकन करून प्राधान्यक्रमानुसार यादी तयार करावी. कोकणात उपलब्ध गवताची कापणी सुरू करण्यात आली असून, नव्याने चारा उपलब्ध होईपर्यंत टंचाईग्रस्त जिल्ह्यांना तेथून शक्य तितका चारा पाठविण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे मंत्री गोगावले यांनी सांगितले. व्हीबी जी राम जीअंतर्गत ७६ कोटी रुपयांचे निधी हस्तांतरण आदेश प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ३८ कोटी रुपयांची प्रक्रिया पूर्ण करून संबंधित लाभार्थी तसेच अंमलबजावणी यंत्रणा असलेल्या ग्रामपंचायतींच्या खात्यांत रक्कम वर्ग करण्यात आली आहे.

उर्वरित ३८ कोटी रुपयांचे प्रमाणीकरण पूर्ण करून येत्या शुक्रवारपर्यंत वितरण करण्याची कार्यवाही विभागाने करावी, असे मंत्री गोगावले यांनी सांगितले. अकुशल कामांची मजुरी मस्टर बंद झाल्यानंतर उशिरात उशिरा सहा दिवसांच्या आत कामगारांच्या खात्यात जमा होईल, याची दक्षता घ्यावी. राज्यातील सर्व प्रलंबित प्रकरणांची जिल्हानिहाय कारणे तपासून तातडीने कार्यवाही पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी दिले. रोजगार सेवकांच्या मानधनासाठी निधी उपलब्ध करून दिल्यानंतरही ग्रामपातळीवरील अडचणींमुळे मानधन प्रलंबित राहू नये, असेही मंत्री गोगावले यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

जगमित्र

मकसूद पटेल (जिल्हा प्रतिनिधी) मो.9767785855, 9422797473

शेख मौला शेख उस्मान (उपसंपादक नांदेड जिल्हा आवृत्ती) मो.9766664949

PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — मंगळवार दि.१७ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

बजाज फायनान्सवाल्यांकडून मानसिक त्रास; तरुणाचा मृत्यू, कुटुंबीयांचा गंभीर आरोप



नांदेड/प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीत फायनान्सवाल्यांकडून सक्तीने वसुली सुरू आहे. शासनाने आदेश देऊनही फायनान्सवाले शासनाच्या आदेशाला जुमानत नसल्याचे दिसून येत आहे. असाच काहीसा प्रकार नांदेड शहरात घडला आहे. बजाज फायनान्सच्या थकीत हप्त्यावरून सुरू असलेल्या त्रासाची धास्ती घेत एका ३४ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. मल्लेश राजाराम डुब्बाशेलू असे तरुणाचे नाव असून, तो सांगवी भागातील कुक्कुटपालन येथील रहिवासी होता. याप्रकरणी कुटुंबीयांनी बजाज फायनान्सवाल्यांविरोधात विमानतळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मल्लेश डुब्बाशेलू हा मिळेल ते काम करून कुटुंबीयांचा उदरनिर्वाह करायचा. कुटुंबातील तो एकुलता एक कमावता व्यक्ती होता. बजाज फायनान्सवर त्याने दुचाकी वाहन खरेदी केले होते. नियमित हप्ते भरले होते; मात्र दोन हप्ते थकल्याने बजाज फायनान्सवाल्यांकडून मानसिक त्रास सुरू होता, असा कुटुंबीयांचा आरोप आहे. दुचाकी वाहन नेऊनही मोबाईलवर धमकी दिल्याचे कुटुंबीयांनी तक्रारीत म्हटले आहे.

या धमकीने मल्लेश नेहमी मानसिक तणावात राहत होता आणि कंपनीच्या या धास्तीने रविवारी सकाळी त्याचा मृत्यू झाला, असा आरोप मयताच्या आईने केला आहे. याप्रकरणी लक्ष्मीबाई राजाराम डुब्बाशेलू यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात लेखी तक्रार देऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे.

१६ तालुके टंचाई क्षेत्र घोषित; विहीर-बोअरवेल खोदकामावर बंदी, नियम मोडल्यास कारवाईचा इशारा

बोअरवेल रिग मशीनची १५ दिवसांत नोंदणी बंधनकारक; नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाईचा इशारा

नांदेड/प्रतिनिधी

सन २०२६ च्या खरीप हंगामात झालेली पर्जन्याची मोठी तूट आणि जिल्ह्यातील भूजल पातळीत झालेली घट लक्षात घेऊन नांदेड जिल्ह्यातील सर्व १६ तालुके पाणीटंचाई क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर भूजल उपशावर निर्बंध घालण्यासह नवीन विहिरी व बोअरवेल खोदकामासाठी कडक नियम लागू करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांनी यासंदर्भात महत्त्वपूर्ण आदेश जारी केले आहेत.महाराष्ट्र शासनाच्या २५ सप्टेंबर व १४ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील सर्व तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांतील ग्रामीण व नागरी क्षेत्रे पुढील एक वर्षासाठी किंवा पुढील आदेशापर्यंत पाणीटंचाई क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आली आहेत.नवीन विहिरी व बोअरवेल खोदण्यावर निर्बंध. जिल्ह्यात शेती अथवा औद्योगिक वापरासाठी ६० मीटरपेक्षा अधिक खोल विहीर किंवा बोअरवेल खोदण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून ५०० मीटरच्या परिघात कोणत्याही प्रयोजनासाठी नवीन विहीर अथवा बोअरवेल खोदता येणार नाही.

विद्यमान विहिरींच्या भूजल उपशावर नियंत्रण.

सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून एक किलोमीटर अंतराच्या परिघातील किंवा प्रभाव क्षेत्रातील खासगी विहिरी व बोअरवेलमधून व्यावसायिक अथवा सिंचनासाठी अनिर्बंध भूजल उपसा करण्यावर तात्पुरते निर्बंध घालण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार सार्वजनिक पिण्याच्या पाण्यासाठी अशा विहिरींचे तात्पुरते अधिग्रहण करण्याचे अधिकार संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांना देण्यात आले आहेत.

भूजल विक्री व टँकरद्वारे वाहतुकीस पूर्वपरवानगी आवश्यक.

जिल्हा प्राधिकरणाच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय भूजलाची व्यावसायिक विक्री अथवा टँकरद्वारे अनिर्बंध वाहतूक करण्यास मनाई करण्यात आली आहे. या निर्णयामुळे पिण्याच्या पाण्याचा अनधिकृत व्यावसायिक वापर आणि विक्री रोखण्यास मदत होणार आहे.

बोअरवेल रिग मशीनची १५ दिवसांत नोंदणी अनिवार्य.

जिल्ह्यात कार्यरत असलेल्या सर्व बोअरवेल खोदकाम यंत्रसामग्रीच्या मालकांनी व चालकांनी संबंधित उपविभागीय दंडाधिकारी किंवा तहसीलदार यांच्याकडे १५ दिवसांच्या आत नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रत्येक रिग मशीनवर यंत्रणा बसविणेही आवश्यक आहे. पूर्वपरवानगीशिवाय अनधिकृत बोअरवेल खोदकाम आढळल्यास संबंधित यंत्रसामग्री जप्त करण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

भरारी पथकांमार्फत होणार कारवाई.

आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी व पोलीस प्रशासनाला तपासणी, अनधिकृत खोदकामाची साधने जप्त करणे तसेच आवश्यकतेनुसार वीजपुरवठा खंडित करणे आणि कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

आदेशाचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील तरतुदी तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांविरुद्ध अधिनियमातील कलम ५२ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील उपलब्ध भूजलसाठ्याचे संरक्षण करणे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देणे आणि संभाव्य पाणीटंचाईवर प्रभावी नियंत्रण ठेवणे हा या आदेशाचा मुख्य उद्देश आहे. नागरिक, शेतकरी, औद्योगिक आस्थापना, बोअरवेल व्यावसायिक आणि सर्व संबंधितांनी आदेशातील निर्बंधांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

मुदखेडचे मोहम्मद फैजान यांची बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमासाठी निवड



मुदखेड/प्रतिनिधी

मुदखेड शहरातील ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (अखचखच) पक्षाचे शहराध्यक्ष मोहम्मद हुसैन पीर मोहम्मद यांचे सुपुत्र मोहम्मद फैजान मोहम्मद हुसैन यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नीट (छएएढ णऋ) २०२६ परीक्षेनंतर महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत राबविण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत त्यांची बी.ए.एम.एस. (इरलहशश्रीं ष ऑर्ीिंशवळल चशवळलळपश रपव डीसशी) या वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.

मोहम्मद फैजान यांना इतर मागासवर्गीय (जइउ) प्रवर्गातून उअझ फेरी क्रमांक ४ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमासाठी जागा प्राप्त झाली आहे. त्यांच्या निवडीचे अधिकृत तात्पुरते निवडपत्र १४ नोव्हेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आले आहे. वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण घेण्याचे स्वप्न उराशी बाळगून मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर मोहम्मद फैजान यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या कुटुंबीयांसाठी आनंदाचा व अभिमानाचा क्षण ठरले आहे. त्यांच्या या यशामुळे मुदखेड शहराच्या शैक्षणिक क्षेत्रातही आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मोहम्मद फैजान यांच्या बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमासाठी झालेल्या निवडीबद्दल शहरातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार तसेच नागरिकांनी त्यांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. मोहम्मद फैजान यांनी भविष्यात वैद्यकीय क्षेत्रात उत्तुंग भरारी घेऊन समाजाची सेवा करावी, अशा सदिच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

येरगीची बालपंचायत सरपंच कु.रुद्राणी चेंडके ची राज्य बालसंसदेसाठी निवड

देगलूर/जीह अन्सारी

गावाच्या विकासाची चर्चा आता केवळ मोठ्या व्यासपीठावरच नव्हे, तर चिमुकल्यांच्या आवाजातूनही होणार आहे. बालकांचे हक्क, त्यांचे संरक्षण, शिक्षण, आरोग्य आणि गावाच्या विकासातील त्यांचा सहभाग यांना प्राधान्य देणाऱ्या राज्यस्तरीय बालसंसद उपक्रमात देगलूर तालुक्यातील चालुक्यकालीन ऐतिहासिक नगरी येरगी ग्रामपंचायतीने मानाचा ठसा उमटविला आहे. नांदेड जिल्ह्यातून येरगी ग्रामपंचायतीची या उपक्रमासाठी निवड झाल्याने संपूर्ण देगलूर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, युनिसेफ महाराष्ट्र, यशदा पुणे आणि ग्रामविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी पुणे येथे राज्यस्तरीय बालसंसद उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या महत्त्वपूर्ण व्यासपीठावर येरगी



गावाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी बालपंचायत सरपंच कु. रुद्राणी नरसिंग चेंडके यांना मिळाली आहे.या बालसंसदेतील विशेष बाब म्हणजे कु. रुद्राणी नरसिंग चेंडके या छत्रपती संभाजीनगर विभागाच्या प्रतिनिधी म्हणून दुष्काळ या महत्त्वपूर्ण विषयावर आपले विचार आणि प्रश्न मांडणार आहेत. ग्रामीण भागातील दुष्काळाचा परिणाम, पाणीटंचाई, त्याचा बालकांच्या शिक्षणावर, आरोग्यावर आणि दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम यांसारख्या महत्त्वपूर्ण मुद्द्यांकडे त्या राज्यस्तरीय व्यासपीठाचे लक्ष वेधणार आहेत.

यासोबतच येरगी गावातील बालकांच्या समस्या, अपेक्षा, शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि गावाच्या विकासासंदर्भातील प्रश्नही त्या मांडणार आहेत. त्यामुळे येरगी गावातील बालकांचा आवाज पुण्यातील राज्यस्तरीय बालसंसदेत पोहोचणार आहे. विशेष म्हणजे, नांदेड जिल्ह्यातून येरगी ग्रामपंचायतीची झालेली निवड ही ग्रामीण भागातील बालनेतृत्वाला मिळालेली एक मोठी संधी आहे. तेलंगणा आणि कर्नाटक च्या सीमेवर असलेल्या एका गावातील बालप्रतिनिधीला विभागाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे ही संपूर्ण गावासाठी नव्हे तर नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

श्री संत अगडंमबुवा यात्रेनिमित्त लाल कंधारी पशुधन प्रदर्शन श्रम पशुरोग व रोगनिदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते उत्कृष्ट पशुपालकांचा गौरव; पशुधन संवर्धनाचा दिला संदेश

उस्माननगर .(प्रतिनिधी)

कलंबर (बु.) येथील पंचक्रोशीतील जाज्वल्य देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री संत अगडंमबुवा यात्रेनिमित्त दिनांक १२ नोव्हेंबर २०२६ रोजी लाल कंधारी पशुधनाचे भव्य पशुप्रदर्शन, पशुरोग निदान शिबिर तसेच पशुधन विमा योजनेबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . या शिबिराला पशुपालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमातून पशुपालक व शेतकऱ्यांना पशुधनाचे आरोग्य, संगोपन आणि संरक्षण याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा.श्री प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रथम लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी श्री अगडमबुवा यांचे दर्शन घेऊन सुख - समृध्दीसाठी प्रार्थना केली. तसेच पशुप्रदर्शनाला भेट देवून पशु पालकांशी संवाद साधला.यावेळी जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपायुक्त डॉ.सखाराम खुने ,नांदेड जिल्हा परिषदेचे सहाय्यक आयुक्त प्रविण कुमार घुले, लोहा तहसील कार्यालयाचे तहसीलदार विठ्ठल परळीकर, लोहा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मांजरमकर , उपायुक्त डॉ. अंकुश पाटील, डॉ. आर. एम. पुरी, डॉ. यू. एस. बोदेमवाड, डॉ. बालाजी जाधव, डॉ. उमेश धोंड तसेच कलंबर (बु.) येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. दिप्ती चव्हाण मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमा निमित्त जिल्हा समन्वयक श्री. अनिकेत पोटभरे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका प्रतिनिधी श्री. महेश बरवाड, श्री. प्रमोद कांबळे व श्री. नितीन शिराढोणकर यांनी राष्ट्रीय पशुधन अभियान आणि पशुधन विमा योजनेबाबत पशुपालक व शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. यावेळी राष्ट्रीय पशुधन अभियानाचा जास्तीत जास्त पशुपालक व शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, तसेच आपल्या पशुधनाचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पशुधन विमा उतरवावा, असे आवाहन करण्यात आले. पशुधन विम्याचे महत्त्व, विम्याचे फायदे आणि पशुधनाच्या सुरक्षिततेसाठी विमा संरक्षणाची आवश्यकता याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली.





लाल कंधारी पशुधनाचे प्रदर्शन आणि पशुरोग निदान शिबिरामुळे पशुपालकांना पशुधनाच्या आरोग्यविषयक बाबी जाणून घेण्याची संधी मिळाली. या उपक्रमाला पशुपालक व शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्री संत अगडमबुवा यात्रेनिमित्त आयोजित या उपक्रमातून पशुधन संवर्धन, पशुरोग प्रतिबंध आणि पशुधन विम्याबाबत जनजागृती करण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला. यावेळी माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे ढाकणीकर, माजी जि.प.सदस्य बालाजी परदेशी,माजी सभापती बाबू अप्पा मुक्कनवार, दत्ता पाटील हाळदेकर,साईनाथ पाटील कपाळे, विरभद्र राजूरे ,सुधिल अप्पा ,सरपंच उमाकांत सोरगे ,माजी सरपंच मनुसिंग ठाकूर ,श्रीधर गोरे , चेअरमन मनुअप्पा मुक्कनवार, सामाजिक कार्यकर्ते डी.के.कांबळे ,बळी पाटील भोकरे ,प्रकाश घोरबांड, बालाजीराव बोईनवाड , केदार मुक्कनवार, गोविंद घूले ,दीपक म्हैसकर , मोहन गाजेवार,पिंटू मरमठ यांच्यासह अनेक मान्यवर, ग्रामस्थ व पशुपालक उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी श्री ए.व्ही.शिंदे. प्रशासकीय अधिकारी एम.एस.म्हेत्री,तसेच यात्रा कमिटी ,गावकरी व ग्रामपंचायत कर्मचारी नारायण सगरोळे ,दत्तूसिंह भगिले ,सुरेश मोरे,शाम नागठाणे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परीश्रम घेतले.

कलाल गौड तेलंग समाज युवा प्रतिष्ठानच्या वतीने सिने कलाकारांचा भव्य दिव्य सत्कार सोहळा संपन्न!

आतिषबाजी, मानाचा फेटा, शाल, पुष्पहार व श्रीफळ देऊन कलाकारांचे उत्साहात स्वागत

नांदेड/प्रतिनिधी

कलाल गौड तेलंग समाज युवा प्रतिष्ठान, नांदेड येथील संस्थेच्या कार्यालयात चित्रपट क्षेत्रातील गब्बर इज बॅक व शिवाजी द बॉस फिल्म फेम सुप्रसिद्ध सिने अभिनेते सुमन गौड तलवार, दिग्दर्शक मुकेश आर. के. चौकसे , सिने अभिनेत्री प्रीती चौकसे तसेच दिग्दर्शक नितीन मुकेश चौकसे आणि आगामी चित्रपट चित्रपटात श्रीकृष्णाचा रोल करणारी ५ वर्षाची बॉबी चौकसे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी संस्थेच्या वतीने त्यांचा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात भव्य दिव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.या आगमनावेळी आतिषबाजी करून कलाकारांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. संस्थेच्या वतीने मानाचा फेटा, शाल, पुष्पहार व श्रीफळ देऊन सर्व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. तसेच संस्थेच्या महिला पदाधिकाऱ्यांनी पारंपरिक पद्धतीने औक्षण करून कलाकारांचे स्वागत केले.यावेळी अखिल भारतीय कलवार, कलाल, कलार महासभा, दिल्लीचे नांदेड जिल्हाध्यक्ष अशोक पडलवार, जिल्हा महासचिव गंगाधर नंदेवाड, कलाल गौड तेलंग समाज युवा प्रतिष्ठान, नांदेडचे संस्थापक अध्यक्ष तथा अखिल भारतीय कलवार, कलाल, कलार महासभा, दिल्ली चे राष्ट्रीय सचिव सुनील अनंतवार, संस्थेचे सचिव शंकर



रायपलवार, उपाध्यक्षा शीला अनंतवार, सहसचिव प्रियंका अनंतवार, कोषाध्यक्ष मनोज अनंतवार तसेच सदस्य नागनाथ कुच्चेवार, अनिल अनंतवार, माया कुच्चेवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी चित्रपट क्षेत्रातील कलाकारांशी संवाद साधत त्यांच्या कलाप्रवासाचे कौतुक केले. समाजातील विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या गुणवंत व्यक्ती, कलाकार आणि कलावंतांना सन्मान देणे ही समाजाच्या सांस्कृतिक जडणघडणीसाठी महत्त्वाची बाब असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

विशेष म्हणजे, गब्बर इज फेम आणि शिवाजी द बॉस या चित्रपटांशी संबंधित कलाकार व दिग्दर्शकांच्या उपस्थितीमुळे संस्थेच्या कार्यालयात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. आगामी काळात प्रदर्शित होणाऱ्या श्री खाटू श्याम सरकार या चित्रपटाच्या निमित्ताने उपस्थित कलाकारांना संस्थेच्या वतीने मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. हा आगामी चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरावा आणि चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांना एक चांगला अनुभव मिळावा, अशा सदिच्छाही यावेळी व्यक्त करण्यात आल्या.सदर सिने कलाकार नांदेड येथे आपल्या चित्रपटाचे पोस्टर व ट्रेलर लॉन्च करण्यासाठी तसेच पत्रकार परिषदेसाठी आले असताना त्यांनी कलाल गौड तेलंग समाज युवा प्रतिष्ठानच्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या भेटीच्या निमित्ताने संस्थेच्या पदाधिकारी व सदस्यांना चित्रपट क्षेत्रातील मान्यवरांशी संवाद साधण्याची आणि त्यांचा सन्मान करण्याची संधी मिळाली.कलाकारांचा सन्मान, सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक क्षेत्राला प्रोत्साहन देण्याची परंपरा जपणाऱ्या कलाल गौड तेलंग समाज युवा प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. हा सत्कार सोहळा आनंदी, उत्साही आणि अविस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.

मेंदू आणि मणक्याच्या आधुनिक उपचारांसाठी डॉ.रवनीतसिंघ छाबडा दुसऱ्या रविवारी नांदेडमध्ये

नांदेड/प्रतिनिधी

मेंदू आणि मणक्याच्या आजारांवर आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या मदतीने अनेक उपचार पर्याय उपलब्ध झाले आहेत. काही आजारांमध्ये मोठी शस्त्रक्रिया न करताही लेझर, रेडिओफ्रिक्वेन्सी आणि दुर्बिणीद्वारे उपचार करणे शक्य होत आहे. या क्षेत्रातील अनुभवी मेंदू व मणक्याचे शल्यचिकित्सक डॉ. रवनीतसिंघ छाबडा हे प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या रविवार,रोजी नांदेडमध्ये रुग्णांना वैद्यकीय सल्ला व मार्गदर्शन करण्यासाठी येत आहेत. सकाळी ९ ते ११ या वेळेत दशमेश हॉस्पिटल येथे त्यांचा रुग्णपरामर्श आयोजित करण्यात आला आहे.

शक्यतो शस्त्रक्रिया टाळून उपचार करण्यावर भर

मेंदू आणि मणक्याच्या प्रत्येक आजारात शस्त्रक्रिया करणे आवश्यक नसते. आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या मदतीने औषधोपचार, कमी चिरफाड करून केले जाणारे उपचार आणि आवश्यकतेनुसार सूक्ष्म शस्त्रक्रियेला प्राधान्य दिले जाते. केवळ अत्यंत आवश्यक असेल तेव्हाच मोठी शस्त्रक्रिया करण्याचा आमचा प्रयत्न असतो, असे प्रतिपादन हैदराबाद येथील यशोदा हॉस्पिटल, सोमाजीगुडा येथे कार्यरत मेंदू व मणक्याचे शल्यचिकित्सक डॉ. रवनीतसिंघ छाबडा यांनी नांदेड येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले.

यशोदा हॉस्पिटलमध्ये मेंदू आणि मणक्याच्या विविध आजारांवर उपचार करताना दुर्बिणीद्वारे तसेच कमी चिरफाड करून केल्या जाणाऱ्या आधुनिक उपचार



पद्धतींचा जास्तीत जास्त वापर केला जातो, असेही त्यांनी सांगितले.

देश-विदेशातील प्रशिक्षणाचा अनुभव

डॉ. रवनीतसिंघ छाबडा यांनी अमृतसर येथे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर दिल्ली येथील एम्सच्या मेंदू शस्त्रक्रिया विभागात काम केले आहे. दिल्ली आणि दक्षिण कोरिया येथे दुर्बिणीद्वारे मणक्याच्या शस्त्रक्रियेचे, तर जर्मनी येथे आधुनिक रेडिओसर्जरीचे विशेष प्रशिक्षण घेतले आहे. सध्या ते हैदराबाद येथील यशोदा हॉस्पिटल, सोमाजीगुडा येथे रुग्णसेवा देत आहेत. मणक्याच्या आजारांवर लेझर आणि दुर्बिणीद्वारे उपचार.कंबर आणि मानेतील डिस्कमुळे नसांवर येणारा दबाव कमी करण्यासाठी निवडक रुग्णांमध्ये लेझर आणि रेडिओफ्रिक्वेन्सी उपचारांचा उपयोग केला जातो. मानेच्या सांध्यांच्या वेदनांवरही रेडिओफ्रिक्वेन्सी उपचार करता येतात. डिस्कचा त्रास अधिक असल्यास शस्त्रक्रियेची गरज भासणाऱ्या रुग्णांमध्ये दोन छोट्या छेदांद्वारे दुर्बिणीच्या मदतीने डिस्कचा त्रासदायक भाग काढता येतो.

17 Nov 2026_Layout 1 11/16/2026 11:36 PM Page 2

माजलगावात महिलांचे सार्वजनिक शौचालय पाडल्याचा आरोप!

महिला नगराध्यक्षांसह संबंधित पदाधिकाऱ्यांवर कारवाई करा; शेख तौसिफ सत्तार यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

माजलगाव/प्रतिनिधी

माजलगाव नगरपालिकेच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, प्रभाग क्रमांक ०८ मधील महिलांसाठी असलेले सार्वजनिक शौचालय अचानक पाडण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच संबंधित महिला नगराध्यक्ष व उपाध्यक्ष यांची पदे रद्द करण्यात यावीत, अशी मागणी शेख तौसिफ अब्दुल सत्तार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, माजलगाव नगरपालिकेतील शासकीय गोडाऊनजवळ प्रभाग क्रमांक ०८ मध्ये महिलांसाठी सार्वजनिक शौचालय उपलब्ध होते. परिसरातील महिला, कामगार, मुली तसेच ये-जा करणाऱ्या महिलांसाठी हे शौचालय अत्यंत महत्त्वाचे होते. मात्र, विद्यमान महिला नगराध्यक्षांच्या कार्यकाळात आणि त्यांच्या संमतीने अथवा आदेशाने कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न राबवता हे सार्वजनिक शौचालय अचानक पाडण्यात आल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.

स्वच्छ भारत अभियान आणि शासनाच्या नियमांनुसार सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी स्वच्छतागृह उपलब्ध करून देणे ही नगरपालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे.



असे असताना केवळ राजकीय स्वार्थापोटी किंवा विशिष्ट हेतूने शौचालय पाडण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकारामुळे महिलांच्या आरोग्याचा आणि सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे. या प्रकरणाची जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि संबंधित पदाधिकाऱ्यांची पदे रद्द करण्याबाबत योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

महिलांच्या मूलभूत सुविधांवरच घाला घातला जात असेल, तर नगरपालिकेचा कारभार (पान २ वर)

आरेफ शेख हत्या प्रकरणात पंकजाताई मुंडेंनी तातडीने लक्ष घालावे

पीडित कुटुंबीयांची भेट घेऊन आर्थिक मदत करावी-जे.डी. शाह

बीड/प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील ऊसतोड कामगार आरेफ शेख यांच्या संशयास्पद मृत्यूने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, या प्रकरणात घातपात करून निर्घृण हत्या करण्यात आल्याचा आरोप त्यांच्या कुटुंबीयांकडून करण्यात येत आहे. या प्रकरणातील दोषी आरोपींना कठोरात कठोर शिक्षा, अगदी फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी पीडित कुटुंबीयांनी केली आहे. मात्र, या गंभीर घटनेनंतरही ऊसतोड कामगारांचे नेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या राजकीय वारशाचा दावा करणाऱ्या राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांनी अद्याप पीडित कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले नसल्याबद्दल समाजातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

यासंदर्भात समाजसेवक जे.डी. शाह यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे पंकजाताई मुंडे यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून पीडित कुटुंबीयांना भेट द्यावी, आर्थिक मदत मिळवून द्यावी आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी केली आहे.

प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, पंकजाताई मुंडे यांनी एकीकडे ऊसतोड कामगारांच्या फडात जाऊन भाऊबीज साजरी केली. ऊसतोड कामगारांप्रती आपुलकी व्यक्त केली. मात्र, दुसरीकडे बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील एका मुस्लिम ऊसतोड कामगाराची निर्घृण हत्या झाल्याचा आरोप असताना त्याच्या कुटुंबीयांच्या घरी जाऊन सांत्वन करण्याचे साधे सौजन्यही दाखविले नाही, ही बाब अत्यंत खेदजनक आहे. ऊसतोड कामगार कोणत्या जातीचा, धर्माचा आहे, हे पाहण्यापेक्षा तो सर्वप्रथम एक कष्टकरी ऊसतोड कामगार आहे, ही भावना महत्त्वाची आहे. कारण आरेफ शेख यांच्या शरीरावर अनेक (पान २ वर)

लोहा-कंधार मतदार संघात २६ कोटी ४३ लक्ष रुपयांच्या कामांचे आज भूमिपूजन

माजी आ.ईश्वरराव भोसीकर यांच्या हस्ते भूमिपूजन

लोहा/अशोक सोनकांबळे

लोहा तालुक्यातील गोदाकाठच्या पेनूर, अंतेश्वर, भारसवाडा या गावात अंतर्गत सिमेंट रस्त्यासाठी १२ कोटी, कंधार शहरासाठी ४ कोटी व रस्त्यासाठी १० कोटी ८५ लक्ष रुपये असे एकूण २६ कोटी ४३ लक्ष रुपयांचा निधी विधीमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आपल्या मतदार संघासाठी आणला आहे त्या कामाचा शुभारंभ मंगळवारी (१७ नोव्हें) जेष्ठ नेते माजी आमदार ईश्वरराव भोसीकर याच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीआ. प्रतापराव पाटील चिखलीकर राहणार आहेत. लोहा-कंधार भागाच्या विकासासाठी निवडणूक काळात जी जी आश्वासने दिली होती त्याची पूर्तता केली जात आहे.आ प्रतापराव पाटील यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याशी असलेले संबंध तसेच प्रशासना-वरील पकड पाहता लोकांच्या त्यांच्याकडून अपेक्षा वाढत्या आहेत. मतदार संघातील रस्त्यासाठी त्यांनी २६कोटी ४३ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे त्या कामाचा शुभारंभ अंतेश्वर, भारसवाडा पेनूर, घोडज महाराणा प्रताप चौक, , म. बसवेश्वर पुतळा कंधार येथे हे भूमिपूजन होणार आहे.

गोदाकाठच्या तीन गावांसाठी १२ कोटी

लोहा तालुक्यातील पेनूर, अंते श्वर, भारसवाडा ही तीन गावे गोदाकाठी वसली आहेत. या तिन्ही गावात अंतर्गत सिमेंट रस्ते व बंदिस्त नाली बांधकाम केले जाणार आहे. पेनूर ४ कोटी ९९ लक्ष, अंबेश्वर ३ कोटी ९९ लक्ष, भारसवाडा २ कोटी ९९ लक्ष अशी एकूण ११ कोटी ९७ लक्ष रुपयांच्या कामाचा शुभारंभ होणार आहे. कंधार शहरातील महाराणा प्रताप चौक ते गुलाबवाडी म. बसवेश्वर महाराज पुतळा तसेच उपजिल्हा रुग्णालय ते शहर पर्यंत चौपदरीकरण यासाठी ४ कोटीची तरतूद केली आहे. त्यामुळे कंधार शहरात येणारे रस्ते आता प्रशस्त होणार (पान २ वर)

एन.व्ही.पी. शुगरकडून शेतकऱ्यांना ४ कोटी ८० लाखांचे ऊस बिल अदा!



धाराशिव/प्रतिनिधी

एन.व्ही.पी. शुगर प्रा. लि. जागजी कारखान्याने चालू तृतीय गळीत हंगाम २०२६-२७ मध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेत ऊस बिल अदा करण्याची परंपरा कायम राखली आहे. चौथ्या पंधरवड्यात कारखान्याकडे गाळपासाठी आलेल्या १५ हजार ४९३ मेट्रिक टन उसाचे प्रतिटन ३ हजार १०० रुपये दराने एकूण ४ कोटी ८० लाख रुपयांचे ऊस बिल शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आले आहे.

कारखान्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताला प्राधान्य देत गाळपासाठी आलेल्या उसाचे बिल निर्धारित वेळेत अदा करण्यावर भर दिला आहे. चाचणी गळीत हंगामापासूनच (पान २ वर)

बीड जिल्हा रुग्णालयातील कॅन्टीनचे मॅनेजर अब्दुल गणीभाई ठरताहेत रुग्णांसाठी देवदूत

बीड/प्रतिनिधी

शासकीय रुग्णालयातील जेवणाबाबत अनेकदा तक्रारी ऐकायला मिळतात, मात्र बीड जिल्हा रुग्णालयातील कॅन्टीन याला सन्माननीय अपवाद ठरले आहे. येथील कॅन्टीनचे मॅनेजर अब्दुल गणीभाई यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे आणि उत्तम नियोजनामुळे रुग्णांना चक्क फाईव्ह स्टार रेस्टॉरंटसारखे चवदार व सकस भोजन मिळत आहे. केवळ रुग्णालयातच नव्हे, तर शहरातील निराधार आणि बेघर गरिबांची भूक भागवून गणीभाई खऱ्या अर्थाने देवदूत ठरत आहेत. त्यांच्या या निस्वार्थ सामाजिक कार्याची दखल घेऊन प्रशासनाने त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करावे, अशी जोरदार मागणी बीडकर जनतेतून होत आहे. जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना लवकर बरे होण्यासाठी सकस आहाराची नितांत गरज असते. हीच बाब लक्षात घेऊन अब्दुल गणीभाई स्वतः लक्ष घालून रुग्णांसाठी शुद्ध शाकाहारी आणि चवदार जेवण तयार करून घेतात. यामध्ये रुग्णांच्या प्रकृतीनुसार प्रत्येक वॉर्डात वेळोवेळी व्हिटॅमिनयुक्त जेवण, चहा, केळी, उकळलेली अंडी,



दूध, ब्रेड, पोहे, उपमा असे विविध पौष्टिक खाद्यपदार्थ पोहोचवले जातात. जेवणाचा दर्जा आणि स्वच्छता यामुळे रुग्ण व त्यांचे नातेवाईक समाधान व्यक्त करत आहेत. गणीभाईंचे समाजकार्य केवळ रुग्णालयाच्या भिंतींपुरते मर्यादित नाही. दररोज कॅन्टीनमधून कित्येक गरजू आणि गरिबांना कोणतीही अपेक्षा न ठेवता मोफत जेवणाचे डबे दिले जातात. एवढेच नव्हे, तर रात्री कॅन्टीन बंद झाल्यानंतर गणीभाई स्वतः आपल्या गाडीवरून शहरात फिरतात आणि रस्त्यावर राहणाऱ्या बेघर, निराधार व्यक्तींना शोधून त्यांना जेवणाचे डबे देतात. कोणीही उपाशी झोपू नये, हाच त्यांचा यामागचा प्रामाणिक उद्देश आहे.

राज्यस्तरीय पुरस्काराची मागणी..

कोणताही गाजावाजा न करता अहोरात्र सुरू असलेल्या अब्दुल गणीभाईंच्या या माणुसकीच्या सेवेचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या निस्वार्थ कार्याची शासन व जिल्हा प्रशासनाने दखल घ्यावी आणि त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरवावे, अशी भावना सामान्य नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांमधून व्यक्त केली जात आहे.

व्यापारी संकुलातील १८ गाळेधारकांना अनामत रक्कम भरण्यासाठी एक महिन्याची मुदत

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

कृषी उत्पन्न बाजार समिती, परळी-वैजनाथ अंतर्गत सिरसाळा येथील कै. पंडितअण्णा मुंडे व्यापारी संकुलातील गाळे मिळविण्यासाठी अनामत रक्कम भरलेल्या १८ जणांनी अद्याप संपूर्ण अनामत रक्कम भरलेली नसल्याचे समोर आले आहे. या थकबाकीदारांना उर्वरित अनामत रक्कम भरण्यासाठी बाजार समितीने आता एक महिन्याची अंतिम मुदत दिली आहे.

बाजार समितीने प्रसिद्ध केलेल्या जाहीर सूचनेनुसार, व्यापारी संकुलातील गाळ्यांसाठी १८ जणांनी अनामत रक्कम भरली होती. मात्र, काहींनी अनामत रक्कम अर्धवट भरली असून उर्वरित रक्कम अद्याप जमा केलेली नाही. याबाबत बाजार समितीने वेळोवेळी नोटिसा देऊनही संबंधितांकडून रक्कम भरणा करण्यात आलेला नसल्याचे सूचनेत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या दि. २९ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्रमांक ४ नुसार, पुन्हा जाहीर सूचना प्रसिद्ध करून संबंधित १८ जणांना उर्वरित अनामत रक्कम भरण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या मुदतीत संबंधितांनी उर्वरित अनामत रक्कम जमा न केल्यास त्यांनी यापूर्वी अर्धवट भरलेली अनामत रक्कम जप्त (पान २ वर)

बीड जिल्ह्यातील बोअरवेल निर्बंध उठवा-नुमान चाऊस

शेतकरी आणि सामान्य नागरिकांना दिलासा द्या

बीड/प्रतिनिधी



जिल्ह्यातील भूजल पातळी खालावत असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने २ नोव्हेंबर २०२६ पासून नवीन बोअरवेल व विहिरी खोदण्यासाठी निर्बंध लागू केले आहेत. या निर्णयामुळे शेतकरी आणि पाणीटंचाईने त्रस्त सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी या निर्णयाचा पुनर्विचार करून निर्बंध उठविण्याची मागणी केली आहे. भूजल संरक्षण आवश्यक असले तरी शेतकऱ्यांना पिके, फळबागा आणि जनावरे वाचविण्यासाठी पाण्याची गरज आहे. त्यामुळे गावनिहाय भूजल परिस्थितीचा अभ्यास करून निर्बंध उठवावेत किंवा आवश्यक त्या ठिकाणी शिथिल करावेत. तसेच गरजू शेतकरी आणि पिण्याच्या पाण्यासाठी अडचणीत असलेल्या कुटुंबांना विशेष सवलत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. भूजल संरक्षणाला आमचा विरोध नाही; मात्र त्याच्या नावाखाली शेतकरी आणि सामान्य नागरिकांच्या पाण्याच्या गरजांकडे दुर्लक्ष होता कामा नये. जिल्हाधिकाऱ्यांनी जनतेच्या अडचणी लक्षात घेऊन बोअरवेल निर्बंध तातडीने उठवावेत किंवा शिथिल करावेत, अशी ठाम मागणी मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केली आहे.

उद्या कारखानदारासोबत शेतकरी संघटनेची बैठक

धाराशिव/प्रतिनिधी

१६ नोव्हेंबरला धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर, शेतकरी संघटनेने आंदोलन केल्यानंतर, आता १८ नोव्हेंबरला कारखानद-ारासोबत शेतकरी संघटनेची बैठक होणार असल्याचे प्रशासनाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

दुष्काळी मदत, उसाला चार हजार रुपये पहिली उचल आणि पीकविम्यासाठी आक्रमक झालेल्या शेतकरी संघटनेने १६ नोव्हेंबरला तीव्र आंदोलन केले. दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तालुक्यातील येडशी टोलनाक्यावर बेमुदत चक्काजाम आंदोलन करण्यात आले. माजी खासदार राजू शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली दुपारी दीड वाजता आंदोलनाला सुरुवात झाली. आंदोलकांनी रस्त्यावर ठिय्या मांडल्याने एका बाजूला येडशी टोलनाका ते उपळा पती आणि दुसऱ्या बाजूला चोराखळी परिसरापर्यंत वाहतुकीचा खोळंबा झाला. तब्बल पाच ते सहा तास हे आंदोलन सुरू होते. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांना तातडीने एक लाख रुपयांची मदत द्यावी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन चार हजार रुपये पहिली उचल द्यावी, जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या दावणीला चारा उपलब्ध करून द्यावा, तसेच प्रलंबित पीकविमा रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशा प्रमुख मागण्या आंदोलकांनी केल्या. आंदोलनादरम्यान आंदोलकांसाठी जेवणाचीही व्यवस्था करण्यात आली होती. चपाती आणि डाळ-भाताचे जेवण करून आंदोलकांनी आंदोलन सुरूच ठेवले. चक्काजाममुळे महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला. मात्र, या दरम्यान रुग्णवाहिकेला आंदोलकांनी तत्काळ वाट करून दिली. त्यामुळे अत्यावश्यक सेवेतील वाहनांना मार्ग उपलब्ध करून देण्यात आला. आंदोलकांची भूमिका जाणून घेण्यासाठी धाराशिवचे नायब तहसीलदार यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. मात्र, आंदोलकांनी त्यांच्या चर्चेला प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली. चर्चेदरम्यान १८ (पान २ वर)

संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागात जननायक बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात समाजाच्या अस्मितेसाठी, हक्कांसाठी आणि स्वाभिमानासाठी संघर्ष करणारे महान जननायक, क्रांतिकारक आणि आदिवासी समाजाचे प्रेरणास्थान जननायक बिरसा मुंडा यांची जयंती श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागात मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.विद्यार्थ्यांमध्ये थोर महापुरुषांच्या विचारांची ओळख निर्माण व्हावी, त्यांचे कार्य समजावे आणि त्यांच्यात राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी व सेवाभावाची मूल्ये रुजावीत, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री पद्मावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे यांनी भूषविले.



प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव श्री. दीपक तांदळे तसेच संस्कार प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. अमरशील गायकवाड सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते जननायक बिरसा मुंडा आणि शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. (पान २ वर)





अ.क्र	लोहा-कंधार तालुक्यातील विविध विकास कामे	रक्कम	वेळ	कामाचे ठिकाण
1	भी. अंतेश्वर ता.लोहा जि.नांदेड येथे गावातंर्गत सी.सी.रस्ता व बंदिस्तनाली बांधकाम करणे.	3.99 कोटी	स.9.00 वा.	अंतेश्वर ता.लोहा
2	भी. भारसवाडा ता.लोहा जि.नांदेड येथे गावातंर्गत सी.सी.रस्ता व बंदिस्तनाली बांधकाम करणे.	2.99 कोटी	स.10.00 वा.	भारसवाड ता.लोहा
3	भी. पेनूर ता.लोहा जि.नांदेड येथे गावातंर्गत सी.सी.रस्ता व बंदिस्तनाली बांधकाम करणे.	4.99 कोटी	दु.12.00 वा.	पेनूर ता.लोहा
4	ता.कंधार येथे अहमदपूर-घोटाळा-तिरंगी-कुरुळा-कंधार-बाळळा-गाडगा रस्ता रामा-५६ कि.मी.२१८/० ते २४०/०० सुधारणा करणे. (ए.यु. १०४ धोडज फाटा ते कंधार ते बाळळ ते कौठा रामभा १६१ अ)	1.85 कोटी	दु.2.15 वा.	घोडज रोड मार्केट कमिटीजवळ,कंधार
5	ता.कंधार येथे फुलवळ-हिप्रस-जांब-जळकोट रामा-२५० १) कि.मी.०/०० ते २/३०० (ए.यु.१०४ ते उपविभाग रुग्णालय १० भी रुंद व उपविभाग रुग्णालय ते कंधार शहर चौपदरीकरण करणे. २) कि.मी.२/३०० ते ३/८०० महाराणा प्रताप चौक ते शिवाजी कॉलेज पर्यंत करणे.	4.00 कोटी	दु.2.30 वा.	महाराणा प्रताप चौक कंधार
6	ता.कंधार येथे पानभोसी-आंबेसंगवी रस्ता प्रजिमा-६३ १)कि.मी.०/६०० ते २/०० कंधार शहर ते गुलाबवाडी चौपदरीकरण सी.सी.रोड सह सुधारणा करणे. (महाराणा प्रताप चौक ते म.बसवेश्वर पुतळा) २)कि.मी.२/०० ते ८/०० दुपदरी करणासाठी सुधारणा करणे.	3.61 कोटी	दु.2.30 वा.	महाराणा प्रताप चौक कंधार
7	ता.कंधार येथे कंधार-पानभोसी-आंबेसंगवी ते प्रामा ०६ रस्ता प्रजिमा-६३ किमी २/७०० ते ७/०० (इमामवाडी ते पानभोसी) रस्त्याची पुलमोऱ्यासह रुंदीकरण करणे.	5.00 कोटी	दु.3.00 वा.	महात्मा बसवेश्वर पुतळा कंधार

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).